७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ३० जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## लोकसभेतील गदारोळात राज्यसभेत विधेयक मंजूर

### आता, 'वंदे मातरम'चा अवमान फौजदारी गुन्हा, काय होईल शिक्षा?

नवी दिल्ली (दै. संध्या)

लोकसभेत लोक परीक्षा संशोधन विधेयकावरुन जोरदार चर्चा रंगली होती, सत्ताधारी आणि विरोधक आक्रमक झाल्यानंतर मोठ्या गदारोळात हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले. दुसरीकडे राज्यसभेत वंदे मातरम या गीताच्या अनुषंगाने महत्त्वाचे दुरुस्ती विधेयक संमत झाले आहे. राज्यसभेत आज बुधवारी 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक 2026' मंजूर करण्यात आले. या विधेयकामुळे 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा समावेश संबंधित कायद्याच्या कक्षेत करण्यात आला असून, आता राष्ट्रीय गीताचा अवमान करणाऱ्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल होणार आहे.



देशात काही ठराविक घोषणांवर सातत्याने वाद होतात. त्यामध्ये, जय श्रीराम किंवा वंदे मातरम हे शब्द उच्चारण्यासाठी काही जणांकडून सक्ती केल्याचाही आरोप होतो. तर, कोणाच्या सांगण्यावरुन हे शब्द देशभक्तीचे प्रतिक कसे होऊ शकतात? असा सवालही विचारला जातो. मात्र, आता वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा अवमान केल्यास फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, यासंदर्भातील विधेयक राज्यसभेत संमत झाले आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिक म्हणून वंदे मातरम या गीताचे महत्त्व आहे. एकीकडे लोकसभेत मोठ्या गदारोळात पेपर फुटीसंदर्भातील लोक परीक्षा विधेयक संमत झाले. दरम्यान, राज्यसभेत 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक 2026' मंजूर करण्यात आले. विधेयकातील या दुरुस्तीमुळे 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा समावेश संबंधित कायद्याच्या कक्षेत करण्यात आला असून, राष्ट्रीय गीताचा जाणीवपूर्वक अवमान करणाऱ्या विशिष्ट कृत्यांना आता फौजदारी गुन्हा मानले जाणार आहे. या विधेयकानुसार, 'वंदे मातरम्'चा अपमान किंवा अवमान करणाऱ्या ठराविक कृत्यांवर कायदेशीर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे, आता वंदे मातरम या राष्ट्रीय गीतालाही राष्ट्रीय ध्वज आणि राष्ट्रगीताप्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळणार आहे.

लोकसभाप्रमाणेच राज्यसभेतही विरोधकांच्या गदारोळात वंदे मातरम संदर्भातील या विधेयकावर चर्चा करण्यात आली. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत, राष्ट्रीय राजधानीत नीट (NEET) प्रश्नपत्रिका गळतीप्रकरणी आंदोलन करणाऱ्या निदर्शकांवर पोलिसांनी कथितपणे बळाचा वापर केल्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी केली. त्यानंतर, या विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधकांनी सभात्याग (वॉकआउट) केला. दरम्यान, बहुमताच्या जोरावर हे विधेयक मंजूर करण्यात आले.

#### ३ वर्षांपर्यंतची शिक्षा

दरम्यान, सध्या या कायद्याअंतर्गत राष्ट्रीय ध्वज, भारतीय राज्यघटना आणि राष्ट्रगीत 'जन गण मन' यांना कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. नव्या दुरुस्तीनंतर 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतालाही या कायद्याअंतर्गत वैधानिक संरक्षण मिळणार आहे. प्रस्तावित कायद्यानुसार, 'वंदे मातरम्'च्या गायनात जाणूनबुजून अडथळा निर्माण करणे किंवा ते रोखणे, तसेच राष्ट्रगीताचा अपमान किंवा अनादर करणारी कोणतीही कृती हा दंडनीय गुन्हा मानला जाईल. अशा गुन्ह्यांसाठी कमाल तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.

## जळगावमध्ये २००० महिलांना नाकारली लाडकी बहीण योजना

जळगाव (दै. संध्या)

एकीकडे राज्यातील लाखो लाडक्या बहिणीआम्हाला सरकारकडून पैसे मिळणे बंद झाल्याने संतप्त झाल्या आहेत. राज्यातील सुमारे 92 लाख लाडक्या बहिणींना विविध कारणास्तव योजनेचा लाभ मिळणे बंद झाले असून दुसरीकडे तब्बल दोन हजार महिलांना लाडकी बहीण योजना आम्हाला नको, असे म्हणत महिला व बाल कल्याण विभागाकडे अर्ज केला आहे. एकावेळी एकच योजनेचा लाभ लाभार्थ्यांना घेता येणार असल्याच्या शासनाच्या धोरणामुळे जळगाव जिल्ह्यातील महिलांना हा निर्णय घेऊन शासनाला कळवले आहे. जळगाव जिल्ह्यातील महिलांनी संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाडकी बहीण योजनेचा लाभ नको असल्याचं म्हटलं आहे. जळगावमधील या लाडक्या बहिणींनी लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्हाला नको असल्याचे सांगत, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांकडे अर्ज दिले आहेत. विधानसभा निवडणुकांपूर्वी सरकारने




■ महिला बालकल्याण अधिकाऱ्यांकडे अर्ज

लाडकी बहीण योजना अंमलात आणली होती, त्याला महिलांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यावेळी, सरकारने योजनेतील लाभार्थ्यांची चाळणी केली नव्हती. मात्र, आता चाळणी होत असून लाखो महिलांना योजनेतून थेट वगळण्यात येत आहे. ज्या लाडक्या बहिणींनी युती सरकारला मोठ्या मताधिक्याने विजयी केले होते. त्याच, लाडक्या बहिणींना आता योजनेची नियमावली आणि निकषांचा आधार घेत वगळण्यात येत आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


## राजीनामा घेतलाय, सरकार लाईनवर आलं नाही तर तेही बदलू : अभिजीत दिपकेचा इशारा

छ. संभाजीनगर (दै. संध्या)

जंतर मंतरवरील आंदोलनाच्या यशानंतर आता कॉकरोच जनता पक्षाचा संस्थापक अभिजीत दिपके याने आता केंद्र सरकारला आणखी एक इशारा दिला आहे. सरकारने विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करून त्यांचे रक्त वाहिलं. विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्रास आणि धमक्या दिल्या जात आहेत. सरकारने सुधारावं, विद्यार्थ्यांनी आता फक्त धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला आहे. सरकार जर लाईनवर आलं नाही तर विद्यार्थी उद्या सरकारही बदलतील, असा इशारा अभिजीत दिपके याने दिला.



दिल्लीतील आंदोलनानंतर 40 दिवसांनी अभिजीत दिपके हा छत्रपती संभाजीनगरमध्ये पोहोचला. त्यावेळी त्याच्या आगमनासाठी तरुणांनी गर्दी केल्याचं दिसून आलं. अभिजीत दिपके छत्रपती संभाजीनगरमध्ये येताच तरुणांनी जयघोष सुरू केला. छत्रपती संभाजीनगरमध्ये आल्यानंतर अभिजीत दिपके याने क्रांती चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं दर्शन घेतलं. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या कमानीजवळ जाऊन त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केलं. छत्रपती संभाजीनगरमध्ये आल्यानंतर अभिजीत दिपकेने माध्यमांशी संवाद साधला. तो म्हणाला की, 36 दिवसांनंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश आलं याचा आनंद होतोय. सरकारने आता तरी सुधारावं. 20 जुलै रोजी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला आणि रस्त्यावर विद्यार्थ्यांचं रक्त सांडलं. एवढं रक्त वाहूनही सरकारचं मन भरलं नाही. आता वेगवेगळ्या राज्यातील विद्यार्थ्यांना कारवाईची धमकी दिली जात आहे. पोलीस घरी जाऊन विद्यार्थ्यांना त्रास देत आहेत. हे विद्यार्थी देशाचे भविष्य आहेत. सरकारला असंच काम करायचं असेल तर विद्यार्थ्यांनी आता फक्त धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घेतला आहे, सरकार लाईनवर आलं नाही तर उद्या सरकारही बदलतील.

## पेपरफुटी : लोकसभेत कठोर सुधारणा विधेयक मंजूर

### संघटित गुन्ह्यात सात ते दहा वर्षांपर्यंत तुरुंगवास; दंडाची रक्कम १० कोटींपर्यंत

नवी दिल्ली (दै. संध्या)

देशभरातील विविध स्पर्धा आणि सार्वजनिक परीक्षांमध्ये वारंवार समोर येणाऱ्या पेपरफुटी तसेच अन्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कायदा अधिक कठोर करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. लोकसभेने बुधवारी 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' आवाजी मतदानाने मंजूर केले. या विधेयकामुळे २०२४ मध्ये करण्यात आलेल्या मूळ कायद्यात महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित करण्यात आले असून पेपरफुटी आणि संघटित परीक्षा गैरव्यवहारातील दोषींना अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

लोकसभेत या विधेयकावर मंगळवारी सविस्तर चर्चा झाली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पेपरफुटी, परीक्षांमधील गैरव्यवहार, विद्यार्थ्यांचे नुकसान तसेच परीक्षा यंत्रणेतील त्रुटींबाबत आपापली भूमिका मांडली. अखेर बुधवारी हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ मध्ये पेपरफुटी आणि परीक्षेतील गैरप्रकारांसाठी शिक्षेची



तरतूद आधीपासूनच होती. मात्र, नव्या सुधारणा विधेयकाच्या माध्यमातून या तरतुदी अधिक कठोर करण्यात आल्या आहेत.

पेपरफुटी सारख्या गैरप्रकारात सहभागी व्यक्तींना किमान पाच वर्षांपासून कमाल दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. संघटित स्वरूपात परीक्षा गैरव्यवहार करणाऱ्यांसाठी आणखी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली असून किमान सात वर्षांचा तुरुंगवास आणि मोठ्या आर्थिक दंडाची तरतूद प्रस्तावित आहे. नव्या सुधारणांमध्ये केवळ शिक्षाच कठोर करण्यात आलेली नसून तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यावरही भर देण्यात आला आहे. पेपरफुटी किंवा परीक्षेतील गैरप्रकाराच्या प्रकरणाचा तपास ठरावीक कालमर्यादेत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर खटल्याची सुनावणीही जलदगतीने करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्याची तरतूद आहे. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना अशा प्रकरणांसाठी विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्याची मुभा देण्याचाही प्रस्ताव आहे. गंभीर किंवा मोठ्या प्रमाणावरील परीक्षा गैरव्यवहाराच्या प्रकरणात केंद्र सरकारला विशेष तपास पथक स्थापन करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. पेपरफुटीपुरतेच हे विधेयक मर्यादित नसून उत्तरपत्रिका किंवा ओएमआर पत्रिकेशी छेडछाड करणे, बनावट संकेतस्थळ तयार करणे, बनावट प्रवेशपत्र तयार करणे, परीक्षार्थींना अनधिकृत मदत करणे तसेच परीक्षा प्रक्रियेत तांत्रिक किंवा अन्य मार्गाने हस्तक्षेप करणे अशा विविध गैरप्रकारांचा यात समावेश करण्यात आला आहे.

परीक्षा प्रक्रियेची सुरक्षितता वाढविण्यासाठीही नव्या विधेयकात विशेष भर देण्यात आला आहे. परीक्षार्थींची जैवमितीय नोंदणी, परीक्षा केंद्रांची पूर्वतपासणी, उमेदवारांची तपासणी, आसन व्यवस्था, प्रश्नपत्रिकांची सुरक्षित वाहतूक आणि साठवणूक, परीक्षा केंद्रांवरील देखरेख तसेच परीक्षेनंतरच्या प्रक्रियेसाठी अधिक कठोर प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्याचा मार्ग या सुधारणांमुळे मोकळा होणार आहे.

### ढिंग-टांग




### "आता शेवटचं लढायचं, तुकडाच पाडायचा!"

## मनोज जरांगेंकडून मराठा आरक्षण आंदोलनाची घोषणा

मुंबई (दै. संध्या)

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना म्हटले की, मराठ्यांना वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. कधी नव्हे तो समाज एकवटला त्यामुळे आपल्याला काळजीपूर्वक पुढं जायचं. 29 ऑगस्टला 3 वर्ष पूर्ण होत आहेत. 29 ऑगस्ट रोजी पुन्हा शेवटचं निर्णायक आंदोलन करणार आहे. मनोज जरांगे पाटील यांची अंतरवालीतून घोषणा केली. त्यांनी थेट पुन्हा शेवटच्या आंदोलनाची घोषणा केली. सरकार 58 लाख नोंदीचे प्रमाणपत्र देत नाही म्हणून एकदम मोठं निर्णायक आंदोलन करायचे आहे. ज्यांना माहित आहे की, आपल्या नोंदी सापडल्या त्यांनी तात्काळ अर्ज करा



पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, समाजातील लेकरांचं हाल होत आहे, गेल्या तीन वर्षांपासून रक्त जाळतोय म्हणून समाजाच्या लेकरांसाठी शेवटचं निर्णायक आंदोलन करणार आहे. एकानेही घरी थांबायचं नाही, 58 लाख नोंदीचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सोडायचं नाही. हैद्राबाद गॅझेटीयर दिलं तर मग प्रमाणपत्र का दिल नाही. मराठ्यांना टार्गेट कश्यामुळे करता, आधी तुम्ही स्थानिक चौकशी अहवाल आणला. आता तुकडा पाडल्याशिवाय राहणार. हैद्राबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र घेतल्याशिवाय आता थांबणार नाही. 29 ऑगस्टपासून जोपर्यंत आंदोलन चालणार आहे, तो पर्यंत वेळ द्या. सर्वपक्षीय नेत्यांच्या मुलांना आरक्षण लागणार आहे. 28 ऑगस्टपर्यंत हैद्राबाद गॅझेट नुसार प्रमाण पत्र द्या, असा अल्टीमेटम जरांगे पाटील यांचा सरकारला दिला आहे.

समाजाला वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. आपल्याला 29 ऑगस्टला शेवटचं खूप मोठं निर्णायक आंदोलन करायचं आहे, आपल्या 58 लाख नोंदी राज्यात सापडल्या. त्यांना वारंवार सांगतो त्यांचे प्रमाणपत्र द्या. सरकार नोंदी प्रमाणे प्रमाणपत्र देत नाही म्हणून आंदोलन करण्यात येणार आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांनी अर्ज दाखल करा. तीन वर्ष समाजाच्या कल्याणासाठी रक्त जाळतोय. मला निर्णायक शेवटच आंदोलन करायचे आहे. एक तर ते जातील नाहीतर मी जाईल. 29 ऑगस्टला कोणीही घरी थांबायचे नाही. आपल्याला हैदराबाद गॅझेट दिले, प्रमाणपत्र कधी द्यायचे. सरकारला प्रश्न करत जरांगे म्हणाले, हैदराबाद गझेटीयर दिले, प्रमाणपत्र कधी देता? फडणवीस साहेबांनी मराठ्यांची लेकरं टार्गेट केले, असंही पुढे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. तीन चार महिने झाले प्रमाणपत्र दिले नाहीत. 29 ऑगस्टपासून जोवर आंदोलन चालेल तोवर वेळ द्या. माझे सगळ्या नेत्यांना आवाहन आहे. राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस, सर्वांच्या मुलांना कार्यकर्त्यांना आरक्षण लागणार आहे. हैदराबाद गॅझेटियरनुसार 28 ऑगस्टच्या आत प्रमाणपत्र द्या नाहीतर 29 ऑगस्ट पासून आंदोलन सुरू करणार आहे, सातारा संस्थान, कोल्हापूर, औंध, पुणे, गॅझेटीयर लागू करण्याची मागणी करत आहोत, ते का देत नाहीत. तुमच्या श्रेय वादाच्या लढाईत मराठ्यांचा बळी जात आहे. तीन वर्ष झाले केसेस मागे घेऊ म्हणतात, आम्हाला मारून आमच्यावर केसेस का? सगळ्या केसेस मागे होईपर्यंत 29 ऑगस्टचे आंदोलन मागे नाही ओबीसींच्या सर्व सुविधा मराठ्यांना लागू केल्या. त्यांनी काढलेल्या GR मध्ये पहिली पासून सर्व सुविधा दिल्या, आज परिस्थिती अशी आहे की, एकही सुविधा सुरू नाही, ओबीसी प्रमाणे सोयी सुविधा सुरू केल्या नाहीत. या सोयी एकाही शाळेला नाहीत. कोण कोणाला मुर्खात काढतेय हेच कळेना, अधिकारी सरकारला की सरकार अधिकाऱ्यांना कळत नाही, असंही जरांगेंनी म्हटलंय.

## गृहमंत्र्यांच्या परवानगीशिवाय पेलेट गन वापर शक्य नाही

### अमित शाहांनी विद्यार्थ्यांना चिरडलं; राहुल गांधींचा आरोप



नवी दिल्ली (दै. संध्या)

नीट पेपरफुटीवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज झाल्यानंतर आता त्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं दिसतंय. लोकसभेत या मुद्द्यावरून आपल्याला बोलू दिलं नसल्याचा आरोप करत राहुल गांधींनी यावर माध्यमांशी संवाद साधला. दिल्लीतील लाठीचार्ज हा गृहमंत्री अमित शाह यांच्या आदेशानेच केला. अमित शाहांमुळेच आंदोलक विद्यार्थी हे रक्तबंबाळ झाले, चिरडले गेले, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. अमित शाहांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी राहुल गांधी यांनी केली.

अमित शाह हे देशाचे हिरो आहेत अशी इमेज निर्माण केली जात आहे. त्यासाठी मोठा पैसा लावण्यात आला आहे, वेगवेगळ्या माध्यमांचा वापर केला जात आहे. परंतु विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जमुळे त्यांच्या इमेजचा फुगा फुटला आहे, असा टोला राहुल गांधी यांनी केला.

राहुल गांधी म्हणाले की, दिल्लीत शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. पोलिसांच्या लाठ्यांना खिळेही होते. तसेच यामध्ये विद्यार्थ्यांना विद्युत करंटही देण्यात आला. एका विद्यार्थाला पेलेट गनच्या माऱ्यामुळे अंधत्व आलं आहे. महिलांना, मुलींनाही मारण्यात आलं. यामध्ये पोलीसांच्या वर्दीत नसलेले काहीजणही लाठीचार्ज करत होते.

या प्रकरणावर मी संसदेत बोलत होतो पण मला बोलू दिलं गेलं नाही. यावर मंत्री बोलले, पण मला संधी दिली नाही. मला माफी मागायला लावली, पण मी माफी मागितली नाही. विद्यार्थ्यांचा मुद्दा उपस्थित करणं हा माझा अधिकार आहे, असं राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी म्हणाले की, "दिल्लीतील पोलीस हे केंद्रीय गृहमंत्र्यांच्या नियंत्रणाखाली आहेत. अमित शाहांच्या आदेशानेच पोलीस चालतात. अमित शाहांनीच विद्यार्थांना चिरडलं, मारलं, रक्तबंबाळ केलं. गृहमंत्र्यांच्या आदेशाशिवाय गोळीबार किंवा पेलेटगनचा वापर केला जात नाही. अमित शाहांना याची कशाचीच माहिती नसेल तर ते अकार्यक्षम मंत्री आहेत. 25 जुलै रोजी मी गृहमंत्र्यांना पत्र लिहिलं आणि विद्यार्थ्यांवर लाठीचार्जचा आदेश कुणी दिला असं विचारलं. त्याची माहिती मला अद्याप देण्यात आली नाही. पण जर तुम्हाला वाटत असेल तुम्ही खूप हुशार आहात, तर तसं नाही. लाठीचार्जचा आदेश कुणी दिला याची जबाबदारी निश्चित करणं गरजेचं आहे."

अमित शाह हे लोकसभेत येत नाहीत, लाठीचार्ज कुणी केला याची माहिती देत नाहीत. ते जर अपराधी नसते तर लगेच लोकसभेत आले असते आणि स्पष्टीकरण दिलं असतं. पण ते तसं करत नाहीत, असं राहुल गांधी म्हणाले.

# संपादकीय

## तरुण डॉक्टरांची बॉण्डमुक्ती आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्था

शासकीय महाविद्यालयांमधून एमबीबीएस पास झालेल्या डॉक्टरांना ग्रामीण भागातील रुग्णालयात सेवा देण्याबाबत सरकारशी करावा लागणारा बॉण्ड रहित करण्याचा राज्य सरकारचा निर्णय या डॉक्टरांना दिलासा देणारा आहे. बंधपत्रित डॉक्टरांना पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्याआधी ही एक वर्षाची पोस्टिंग ग्रामीण भागात करणे बंधनकारक होते. ते न केल्यास १० लाख रुपये दंड आकारला जायचा. या डॉक्टरांच्या शिक्षणावर शासकीय महाविद्यालयात राज्य सरकार मोठा खर्च करते, त्या बदल्यात त्यांनी ग्रामीण भागात सेवा द्यावी, ही शासनाची भूमिका कित्येक वर्षापासून होती. दिनांक २३ जुलै २०२६ रोजी वैद्यकीय शिक्षण खात्याने जीआर काढून हे बंधपत्र निकालात काढले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, अनुदानित महाविद्यालये, शिष्यवृत्तीसाठी पात्र खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना बंधपत्राच्या अटीतून मुक्त केले आहे. यामागे नॅशनल मेडिकल कौन्सिलचा पुढाकार आहे. मानसिक तणाव, न पेक्षा दंडाची रक्कम भरण्यासाठी होणारी पालकांची तारांबळ, पदव्युत्तर परीक्षेची तयारी करताना शासकीय रुग्णालयात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपस्थिती या सर्वातून विद्यार्थ्यांची सुटका करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे कळते. बंधपत्रातून सुटका मिळवण्यासाठी भरायच्या दंड-रकमेबाबत सर्व राज्यांमध्ये सुसूत्रता आणण्याचे निर्देश २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.

महाराष्ट्र शासनाने हा निर्णय जाहीर करताना 'आरोग्य खात्याच्या समन्वयाने' असा शब्दप्रयोग वापरला आहे. कारण, या बंधपत्रीत डॉक्टरांच्या मदतीने प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी) चालतात. एमबीबीएस डॉक्टरांविना असलेल्या पीएचसींची संख्या महाराष्ट्रात मोठी आहे. दरवर्षी साधारणपणे ८ ते ९ हजार एमबीबीएस डॉक्टर पदवी घेऊन बाहेर पडतात. वैद्यकीय शिक्षण खात्यातर्फे त्यांना Bonded Docter म्हणून पोस्टिंग मिळते. यापैकी ग्रामीण भागात सेवासुविधा अगदीच मर्यादित, तिथे जाणे शहरी विद्यार्थ्यांसाठी खूप त्रासाचे असते. आदिवासी डोंगरी भागात तर खूपच अडचणी असतात.

मग 'बंधमुक्त' होण्यासाठी दंडाचे पैसे जमवायला शहरी पालकांची धावाधाव सुरू होते. ग्रामीण भागातील मुलांना असा पर्याय नसतो. हेच विद्यार्थी डॉक्टर ग्रामीण आरोग्य व्यवस्था सांभाळताना दिसतात. या व्यवस्थेमध्ये नवोदित डॉक्टरांना विविध प्रकारचे रुग्ण पाहायला मिळाल्याने खूप अनुभव मिळतो हे निर्विवाद आहे. पण, मुळात डॉक्टर होण्यासाठी प्रवेश परीक्षेपासूनची लढाई अनेक वर्षे लढलेला विद्यार्थी आणि पालक घायकुतीला आलेले असतात. मग संयम सुटतो. भूतकाळातील आकडेवारी पाहिली तर ६५ ते ७०% पदवीधर डॉक्टरांनी पोस्टींग स्किप केल्याचे तर काहींनी दंड भरून सुटका करून घेतल्याचे दिसते. आज अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे बीएएमएस डॉक्टरांच्या सहाय्याने चालवली जातात.

नव्या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर कोणते परिणाम होतील, ती व्यवस्था सुधारण्यासाठी काय करावे लागेल, याचाही विचार सरकारने केला पाहिजे. पोस्ट ग्रॅज्युएशन करणाऱ्या डॉक्टरांना हा निर्णय लागू नाही. पण, महाराष्ट्रात पोस्ट ग्रॅज्युएशनच्या जागा कमी आहेत. मग, ग्रामीण भागातील पोस्टींगसाठी येणारे डॉक्टर्स ज्यांना पीजी करायचे आहे, यात मोठी तफावत येईल.

यावर तोडगा काय? महाराष्ट्रात पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी ६०७४ जागा असून यापैकी २५०० च्या आसपास जागा खासगी महाविद्यालयाकडे आहेत. केंद्राचा कोटाही आहे. महाराष्ट्रात १८०० प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. तसेच उप व जिल्हा रूग्णालये आणि महानगरपालिकांची रुग्णालयेही आहेत. या व्यवस्थेचा तोल बिघडू नये म्हणून शासनाने कृती आराखडा तयार केला पाहिजे. अनेक जिल्हा रूग्णालयांचे अस्तित्व संपत चालले आहे. कारण आरोग्य खात्याची रुग्णालये टेकओव्हर केली जात आहेत. भविष्यकाळात आरोग्य खाते काय करणार? वैद्यकीय शिक्षण खाते आणि आरोग्य खाते या दोन वेगळ्या खात्यांना वेगळे मंत्री असतात.

## संस्कृत सुभाषित

आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदु:खयो:।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।

अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दु:ख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

## गुरु वचन

### एका लाकूडतोड्याची गोष्ट

आपण आपल्या लहानपणी ही गोष्ट ऐकलीच असेल. एक लाकूडतोड्या असतो. तो जंगलात एका झाडावर चढून लाकडे तोडत असतो. अचानक त्याच्या हातातून त्याची कुऱ्हाड झाडाखालच्या नदीत कोसळते आणि तो धाय मोकलून रडायला लागतो.

त्याच्याकडे नवी कुऱ्हाड घ्यायला मुळीच पैसे नसताना आणि त्याच्या कुटुंबाचे पोट त्याच्या या कुऱ्हाडीवरच चालत असते. तो झाडे तोडून लाकडं विकून पैसे जमवत असतो.

हे सारं वनातल्या देवाने पाहिलं असते. तो त्या लाकूडतोड्याची परीक्षा घेण्यासाठी रूप बदलून तेथे येतो आणि त्याला रडण्याचे कारण विचारतो. लाकूडतोड्या त्याला झालेला सगळा प्रकार सांगतो आणि त्याला कुऱ्हाड मिळवण्यासाठी मदत करण्याचे आवाहन करतो.

देव पाण्यात उडी घेतो. आधी तो एक सोन्याची कुऱ्हाड काढतो आणि त्या लाकूडतोड्याला विचारतो ही का तुझी कुऱ्हाड? लाकूडतोड्या नाही म्हणतो. मग देव चांदीची कुऱ्हाड काढतो लाकूडतोड्या त्यालाही नाही म्हणतो. मग देव त्याची खरी कुऱ्हाड काढतो आणि विचारतो त्याला अत्यानंद होतो. तीच त्याची खरी कुऱ्हाड असते.

देव आपल्या खऱ्या रूपात येतो आणि विचारतो मी तुला आधी सोने आणि चांदीची कुऱ्हाड दिली, तरी तू त्याला नाही का म्हणालास? लाकूडतोड्या देवाला सांगतो, प्रभू माफ करा परंतु जी वस्तू माझी नाही तिला मी माझी का म्हणू? उगाच मी ती वस्तू घ्यायची आणि नंतर माझी झोप खराब करून घ्यायची याला काय अर्थ? म्हणून मी नाही म्हणालो. देव त्याच्या या उत्तरावर खूश होत त्याला त्या तीनही कुऱ्हाडी भेट देतो.

पाहा कथा किती छोटी आहे, परंतु त्यातून निघणारा अर्थ किती विशाल आहे. जर तुम्ही तुमचे काम अगदी प्रामाणिकपणे केले तर, देव आणि दैवं तुम्हाला कितीतरी पटीने अधिक देते. म्हणून तुम्ही कोणतेही काम करत असाल तर ते अगदी प्रामाणिकपणे करा, तुम्हाला त्यातून नक्कीच यश मिळेल यात शंका नाही.

## उपदेशकथा

### जशी मनोरचना तसे साधन

एका माणसाने एका साधूला विचारले, ईश्वर दर्शनासाठी घरदार सोडावेच लागते का? साधूने उत्तर दिले, कोण म्हणतो? संसारात राहून जनकाने ईश्वरदर्शन करून घेतले. आपल्यालासुद्धा ते साधेल. दुसऱ्या एका माणसाने त्याच साधूला विचारले, घरदार सोडल्याशिवाय ईश्वर दर्शन होऊ शकते काय? साधूने उत्तर दिले, कोण म्हणतो? घरदारात राहून ईश्वरदर्शन झाले असते तर श्री समर्थासारखे संसारातून का निवृत्त झाले असते? साधूने दिलेली उत्तरे परस्परविरोधी दिसतात. पण दोन्ही उत्तरे बरोबर आहेत. ज्याची मनोवृत्ती जशी असते तशी साधना त्याला करावी लागते. सर्वांना एक नियम उपयोगी पडत नाही.

कथा उपदेश : जगात विविध स्वभावाचे लोक असतात. एकाच औषधाने साऱ्यांचे रोग दूर होत नाही. त्यामुळे अध्यात्मातही हा नियम लागू होतो. म्हणून जो तो आपल्या आवडत्या दैवतांची पूजा करीत असतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:श्रवण १७:४३:०० |
| ३० जुलै २०२६ | योग:आयुष्मान |
| गुरुवार | २४:०४:३९+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव ०८:५०:५० |
| आषाढ शके | करण:कौलव २१:३०:३४ |
| संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:मकर |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – १५ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:प्रतिपदा २१:३०:३४ | साईबाबा उत्सव |

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 8 | 1 | 3 | 7 | |
| | | | 7 | 9 | | | | 8 |
| | | | | | 4 | | 9 | |
| 1 | 6 | | | 2 | | | 3 | 4 |
| | 9 | 2 | | 4 | | 5 | 6 | |
| 5 | 4 | | | 7 | | | 2 | 9 |
| | 7 | | 8 | | | | | |
| 3 | | | | 6 | 2 | | | |
| | 1 | 9 | 5 | 3 | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०२४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 5 | 2 | 6 | 1 | 3 | 8 | 9 | 4 |
| 3 | 1 | 4 | 9 | 2 | 8 | 7 | 5 | 6 |
| 8 | 6 | 9 | 4 | 5 | 7 | 1 | 3 | 2 |
| 6 | 9 | 3 | 8 | 7 | 1 | 2 | 4 | 5 |
| 2 | 8 | 1 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 7 |
| 5 | 4 | 7 | 2 | 9 | 6 | 3 | 8 | 1 |
| 9 | 3 | 5 | 7 | 6 | 2 | 4 | 1 | 8 |
| 4 | 7 | 6 | 1 | 8 | 9 | 5 | 2 | 3 |
| 1 | 2 | 8 | 5 | 3 | 4 | 6 | 7 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६२९ – इटलीत भूकंपात १० हजार ठार.
- १९४५ – जपानची पानबुडीने अमिरेकाचे जहाज बुडविले, ८८३ ठार.
- १९७१ – अपोलो १५ मिशन – डेव्हिड स्कॉट आणि जेम्स इर्वीन चंद्रावर उतरले.
- २००६ – इस्त्राईलच्या वायुसेनेने हल्ला करुन १६ मुलांसह २८ लेबनान नागरिकांना ठार केले.
- २००६ – बहारीनमधील एक इमारतीत भीषण आग लागून १६ भारतीयांचा होरपळून मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले.
- २००६ – श्रीलंकेच्या वायुसेनेने लिट्टेच्या एका ठिकाणावर हल्ला करुन ४० बंडखोरांना ठार केले.

### राष्ट्रीय

- २००६ – राज्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्यावरून सरकार आणि पाकिस्तानच्या विरोधात निदर्शने करण्यासाठी श्रीनगरला जाणाऱ्या ८० शिवसैनिकांना पठाणकोट राजमार्गावर पोलिसांनी ताब्यात घेतले.

### जन्म

- १४७० – होंगजी, चीनचा राजा.
- १८९३ – फातेमा जिन्ना, पाकिस्तानची राष्ट्रमाता.
- १९३७ – केझो उबुछी, ८४ वा जपानचा पंतप्रधान.
- १९४७ – अर्नोल्ड श्वार्जनेगर, अभिनेता, बॉडी बिल्डर आणि केलीफोर्नियाचा राज्यपाल.
- १९७३ – सोनू निगम, भारतीय गायक.

### निधन

- ५७९ – पोप बेनडीक्ट पहिला.
- १९१२ – मीईजी, जपानचा राजा.
- १९४७ – जोसेफ कुक, ऑस्ट्रेलियाचा सहावा पंतप्रधान.

## : SMS :

Friend 1 : Bhai tera result kaisa raha?

Friend 2 : Result ne puchha "tu kaisa hai

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.६ | २५.१ |
| अहमदनगर | ३०.४ | २३.१ |
| अकोला | ३१ | २५.९ |
| अमरावती | ३१.५ | २५.६ |
| बीड | ३८ | २५.३ |
| भंडारा | ३८.५ | २६.८ |
| बुलढाणा | ३८.३ | २६.४ |
| चंद्रपूर | ३७.७ | २५.५ |
| चेन्नई | ४२.६ | ३१ |
| नवी दिल्ली | ४०.५ | ३१.६ |
| धुळे | ३५.३ | २५.७ |
| गोंदिया | ३६.५ | २६.४ |
| जळगाव | ३०.९ | २५.८ |
| कोल्हापूर | २७.१ | २२.३ |
| लातूर | ३३.५ | २३.९ |
| मुंबई | ३५.२ | ३२.४ |
| नागपूर | ३८.१ | २५.८ |
| नांदेड | ३५ | २५.८ |
| नंदूरबार | ३१.२ | २५.५ |
| नाशिक | २७.३ | २३ |
| पुणे | २६ | २२.६ |
| पंढरपूर | ३३.९ | २४.९ |
| सातारा | २७ | २१.३ |
| सांगली | ३१.४ | २३.१ |
| सोलापूर | ३४.८ | २५ |
| वर्धा | ३५.२ | २५.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: दक्षिण चांगल्या कामासाठी आज आपला पैसा खर्च होईल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व सहकाऱ्यांवर आज विश्वास ठेवू नका.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा : उत्तर व्यावहारिक संबंधा मुळे फायदा होईल. सहचरणी सोबत वाद घालू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण घरासंबंधी असलेली समस्या दूर होईल. महत्वाचे काम आज पार पडेल.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व कौटूंबिक असहकार्यामुळे मन नाराज होऊ शकते. व्यापारात अडचणी येतील. कामात मन लागणार नाही.

**धनु :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व नवीन व्यापारात प्रगती होण्याचे संकेत मिळतील. बोलण्यावर नियंत्रण राखा. घरातील सदस्यांची प्रगती होईल.

**कर्क :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : उत्तर आत्मविश्वास असल्या कारणाने कोणत्याही कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर व्यापारीक स्पर्धेत विजयी होण्याचे योग आहे. घरासंबंधात समस्या राहू शकते.


**सिंह :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पूर्व नोकरीत आपले महत्व तसेच प्रभाव वाढेल. वास्तविकतेला महत्व देणे गरजेचे आहे.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण प्रवासात आपल्या वस्तू सांभाळा. कोर्ट कचेरीच्या कामात आपल्याला यश मिळेल. कौटुंबिक संबंधात मधुरता येईल.

**कन्या :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पूर्व आत्मविश्वास वाढीस लागल्याने अवघड समस्याही सहज पूर्ण होतील.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व शुभ दिवसाचा चांगला उपयोग करून घ्या. व्यापारातील स्थिती चांगली राहील. जबाबदारीचे काम आज शक्यतो टाळावेत.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२५



### आडवे शब्द

१. सत्तेचा खेळ
४. 'ज्याने चोच दिली -- -- देईल' (म्हण)
७. पर्ण
९. कूर्म
१२. उष्ण
१४. बाहक भीती निर्माण करणाऱ्या दोन छायाग्रहांपैकी एक
१५. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
१८. पृथ्वी
१९. घाई, निकड
२१. पोपटासारखे नाक
२२. हावरटपणा
२४. मराठीत परमेश्वर, हिंदीत हिरवट, इंग्रजीत घाई
२५. फळातील द्रव
२७. युद्ध
२९. वर्ष (ग्रा.)
३२. फार मोठा फायदा
३५. मर्कट
३७. अखेर, शेवट
३८. कीर्तनकार
४१. घराण्याचे नाव कलंकित करणारा
४४. संरक्षक भिंत
४५. फुरसत
४७. लग्न म्हणजे दोनाचे – हात!
४८. लहान मुलांची शाळा
५१. दणकट
५३. रममाण, निमग्न
५५. दृष्टीभेट
५७. सरस्वतीचे एक नाव
५८. नमस्कार
६०. चणचण, न्यूनता
६३. आरास
६५. पोट
६६. हिंदीत श्रावण महिना
६७. अदबशीरपणा
६८. होडी
६९. एक श्वासरोग
७१. गोदाम
७३. चंद्र
७४. सैन्य
७६. एकरूप
७८. झाडावरून गळलेले, माघार
८०. पुढारी, नेता
८२. पक्षी
८३. लाकडी जिना
८४. किरकोळ सामान
८६. घोड्याचे पायताण
८७. मंत्रीमंडळ
८८. चिवट
८९. टिंगल, चेष्टा
९०. वितरण

### उभे शब्द

१. संताप
२. भरजरी
३. 'इडली आणि ऑर्किड' चरित्र या उद्याजकाचे– 'विठ्ठल ---'
४. नखरा
५. सर्वत्र
६. मनाचे ेक लिहिणारे संत
७. साखरेचा रस
८. आश्चर्य
१०. पातळसर
११. व्रत
१४. मातीचा कण
१६. मऊ
१७. मच्छर
२०. कोवळा अंकुर
२३. अंगावरील बारीक केस
२४. आक्षेप, २६. मनाला लागलेली टोचणी
२८. रमापती, ३०. सडपातळ, ३१. कुबड
३३. गालफड आत गेलेला
३४. स्तुती
३६. मणका
३९. सरळ, न थांबता
४०. अस्वल, ४२. मिंधा
४३. वर्ष, सन
४६. चेहरा, मुख
४८. गोणपाट, पोते
४९. उत्तराधिकारी
५०. संध्याकाळ
५१. डोंगराची काळी मैना
५२. खोदकाम
५३. अनुमती
५४. नुकतेच जन्मला आलेले
५६. कणखर, रांगडा
५९. प्रत्येक दिवशी
६१. माकडांची टोळी
६२. एक तारवाद्य
६४. वरपांगी, दिखाऊ
६५. पार्वतीचे एक नाव
६६. सामन्यातील पराक्रमी
६९. किंमत, प्रत्येक
७०. अफूचे बीज
७२. लोकसभेच्या सदस्य
७३. विपत्तीची कहाणी
७५. सर्वनाश, नेस्तनाबूत
७७. सुसर
७८. उद्याच्या नंतरचा दिवस
७९. पादत्राण
८१. केस रंगवण्याचे साधन
८४. आंचळ
८५. भेग, चिर, सापट

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२४ चे उत्तर

आडवे उत्तर १.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

उभे उत्तर : १.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पालखी सोहळा उत्साहात; चिमुकल्यांना वारकरी संस्कृतीची ओळख

**पुणे : दैनिक संध्या**

लोणीकंद येथील एक्सपर्टव्ह्यू प्रीस्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. 'ज्ञानोबा-तुकाराम', 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या नामघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून पालखी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाचा गजर, फुगडी, अभंग आणि भक्तिगीतांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. चिमुकल्या वारकऱ्यांचा उत्साह उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची समृद्ध संतपरंपरा, वारकरी संस्कृती, भारतीय संस्कार, भक्तीभाव तसेच सांस्कृतिक मूल्यांची ओळख करून देण्यात आली. लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या परंपरा आणि संस्कृतीविषयी जिव्हाळा निर्माण व्हावा, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या संस्थापिका वर्षा गोटे आणि सहसंस्थापक नितेश गोटे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगितले. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त, सहकार्याची भावना आणि भारतीय संस्कृतीबद्दल आदर निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

## चातुर्मासानिमित्त 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे कीर्तन महोत्सव

**पुणे : दैनिक संध्या**



■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजन

■ ह.भ.प.डॉ. जयवंत महाराज बोधले, ह.भ.प.केशव महाराज नामदास यांच्यासह महाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकारांचा सहभाग

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांतील दिग्गज कीर्तनकार सहभागी होणार आहेत. कीर्तन महोत्सव दि. १ ते ९ ऑगस्ट दरम्यान आपटे रस्त्याजवळील हॉटेल सेंट्रल पार्क येथे दररोज सायंकाळी ५.३० वाजता होणार असून सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली. चातुर्मासानिमित्ताने शनिवारपासून (दि.१ ऑगस्ट) अनुक्रमे नाशिक येथील वारकरी भूषण श्रीगुरु ह.भ.प.चैतन्य महाराज निंबोळे, आळंदी येथील ज्ञानेश्वरी कंठभूषण ह.भ.प.ओंकार महाराज दुडे शास्त्री, आळंदी साधकाश्रम येथील ह.भ.प.यशोधन महाराज साखरे, पंढरपूर येथील संत नामदेव महाराज यांचे १६ वे वंशज ह.भ.प.केशव महाराज नामदास, डोंबिवली येथील श्रीमलंग गड येथील ऑनलाईन कीर्तन गुरुकुलाचे संस्थापक ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत, परभणी मानवत येथील वारकरीभूषण ह.भ.प. उमेश महाराज दशरथे आणि पंढरपूर येथील मानकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज ह.भ.प.डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे कीर्तन ऐकण्याची संधी मिळणार आहे. शनिवार, दि.८ ऑगस्ट रोजी जगद्गुरु फाऊंडेशनचे संस्थापक जगद्गुरुकृपांकित ह.भ.प.डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तसेच महोत्सवाचा समारोप रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी होणार असून ह.भ.प. भावार्थ महाराज देखणे यांचा भारुडाचा कार्यक्रम होईल. केंद्र सरकारचा उस्ताद बिस्मिला खान युवा पुरस्कार २०२४ हा भारुड कलेसाठी डॉ.देखणे यांना मिळाला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील नामवंत कीर्तनकारांना ऐकण्याची व यामाध्यमातून स्वरब्रह्माची अनुभूती घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. महोत्सवाला प्रवेश खुला असून कीर्तनांचा पुणेकरांनी आनंद घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



## नियोजनपूर्वक ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक : प्रा. डॉ. पराग काळकर

■ पुणे (दै. संध्या)

■ विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

सध्याच्या काळात केवळ परीक्षेमध्ये मिळालेले गुण पुरेसे ठरत नाहीत तर प्रत्येकाने नियोजनपूर्वक ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केल्यास जगात काहीही साध्य करता येते, याची जाणीव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र -कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या वतीने दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. काळकर यांच्यासह आमदार सिद्धार्थ शिरोळे, आयोजक व पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्ष शहराध्यक्ष संजय सोनवणे, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सपना छाजेड, नगरसेविका भक्ति गायकवाड, रिपब्लिकन पक्ष शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक किरण लोखंडे, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. काळकर म्हणाले, पुण्यात जन्माला येणे किंवा शिक्षणाची संधी मिळणे हे विद्यार्थ्यांसाठी भाग्याचे आहे. पुणे शहराला शिक्षणाची शेकडो वर्षांची परंपरा आहे. पुण्यात 35 हून अधिक विद्यापीठे असून शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. विविध शासकीय योजना आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या सामाजिक संस्था यामुळे शिक्षण प्राप्त करणे सुलभ झाले आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे काळकर यांनी नमूद केले. कोणाचीही नक्कल न करता स्वतः कष्ट घेऊन आपल्या कारकिर्दीचे नियोजन करावे. त्या दृष्टीने आपल्याला कोणत्या क्षेत्रात ज्ञान प्राप्त करायचे आहे, कोणती कौशल्य आत्मसात करायची आहेत, याची पुढील पाच वर्षांची रूपरेषा निश्चित करावी, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. भाषा, भाषण आणि संभाषण हे गुण अंगी असणेही यश प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. आपल्या क्षेत्रातील सखोल ज्ञान घेण्याबरोबरच अधिकाधिक वाचनाने इतर क्षेत्रातील माहिती देखील करून घेतली पाहिजे.

# गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेचे भविष्यामध्ये सायबर क्षेत्रापुढे आव्हान

**सायबर क्षेत्रातील तज्ञांचे मत**

**'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' दिवस दुसरा**

■ ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज, डीओटी -एसएसपीयू यांचा संयुक्त उपक्रम

■ पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय तपास प्रशिक्षण कार्यक्रम



■ पुणे (दै. संध्या)

बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील हल्ल्यांचे आणि गुन्हेगारीचे प्रकार बदलत आहेत. आता केवळ आर्थिक लाभासाठीच नव्हे तर गोपनीय माहितीची चोरी करण्यासाठी ही मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले होतात. यामध्ये वैयक्तिक माहिती पासून ते देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा माहितीची चोरी होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेचे भविष्यामध्ये सायबर क्षेत्रापुढे मोठे आव्हान आहे असे मत सायबर क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केली.

ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने पुनीत बालन ग्रुप च्या सहकार्याने पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत दुसऱ्या दिवशी सायबर क्षेत्रातील तज्ञांनी भविष्यामध्ये गोपनीय माहितीचे संरक्षण कशाप्रकारे करता येणे शक्य आहे या संदर्भात प्रशिक्षण दिले. ज्येष्ठ सायबर तज्ज्ञ अमलेश मेंढेकर, कुणाल पाटील यांनी मार्गदर्शन केले . ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज चे प्रमुख केतन अत्रे यावेळी उपस्थित होते.

अमलेश मेंढेकर म्हणाले, ज्याप्रमाणे वैयक्तिक वापरापासून ते देशाच्या संरक्षण क्षेत्रापर्यंत मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे , त्याच प्रमाणे सायबर हल्ल्यांचे प्रमाणही वाढत आहे. सध्या जगामध्ये प्रत्येक 39 सेकंदा नंतर यशस्वी सायबर हल्ला होत आहे . तसेच पाच लाख साठ हजार मालवेअर सॉफ्टवेअर तयार होऊन सायबर हल्ले तयार केले जात आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ल्यांची व्यापकता वाढली आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सायबर हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी पारंपारिक पद्धत पुरेशी पडणार नाही, सायबर हल्ले रोखण्यासाठी आणि त्यांचा तपास करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर वाढणेही तितकेच गरजेचे आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ला कमांड देण्यासाठी पूर्वी कोडींग चा अभ्यास असणे गरजेचे होते परंतु सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स सोबत रोजच्या वापरण्याच्या भाषेमध्येही संवाद साधता येणे शक्य आहे त्यामुळे गुन्ह्याचे प्रमाणही वाढत असून त्यांची क्लिष्टताही वाढत आहे अशावेळी हे गुन्हे सोडविण्यासाठी अधिकाधिक तंत्रज्ञानाची माहिती आणि प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे असेही अमलेश मेंढेकर यांनी यावेळी सांगितले.

## 'बंधिनी' चित्रपटातून साकारणार स्त्री भावविश्वाची कहाणी

■ पुणे (दै. संध्या)



मराठी चित्रपटांत स्त्री विषयक समस्यांचा मागोवा घेणाऱ्या उत्तमोत्तम चित्रपटांची मोठी परंपरा आहे. हीच परंपरा पुढे नेणारा 'बंधिनी' हा चित्रपट येत्या ९ ऑक्टोबरला आपल्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा पोस्टर अनावरण सोहळा संपन्न झाला. यावेळी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

सत्या फिल्म्स कंपनी निर्मित, सतीश वाघेला लिखित आणि संतोष मांजरीकर दिग्दर्शित 'बंधिनी' हा चित्रपट एका स्त्रीच्या भावनिक प्रवासाची कथा मांडतो. देविका या मध्यवर्ती पात्राभोवती फिरणारी ही कथा प्रेम, त्याग, कर्तव्य, कुटुंब आणि स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधाचा संवेदनशील वेध घेते. 'बंधिनी' ही केवळ एका स्त्रीच्या संघर्षाची कथा नसून, प्रत्येक नात्यामधील प्रेम, त्याग आणि आत्मसन्मानाचा अर्थ नव्याने उलगडणारी भावनिक सफर आहे. चित्रपटात अश्विनी बागल, भूषण शिवतरे आणि योगेश तनपुरे यांच्या प्रमुख भूमिका असून, त्यांच्या प्रभावी अभिनयातून ही कथा अधिक सशक्तपणे उलगडणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक संतोष मांजरीकर म्हणाले, "आजच्या काळात प्रत्येक स्त्री स्वतःची स्वप्नं आणि कुटुंबाची जबाबदारी यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करत असते.'बंधिनी' ही अशाच एका स्त्रीची कथा आहे, जी अनेक महिलांच्या आयुष्याशी जोडली जाईल. प्रेक्षकांना विचार करायला लावणारा आणि मनाला स्पर्श करणारा चित्रपट देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

'बंधिनी' हा केवळ मनोरंजन करणारा चित्रपट नाही, तर प्रत्येक कुटुंबाला आणि प्रत्येक स्त्रीला स्वतःमध्ये पाहायला लावणारा अनुभव आहे. या चित्रपटाचा विषय आणि सादरीकरण प्रेक्षकांना नक्की आवडेल असा विश्वास निर्माता सतीश वाघेला यांनी व्यक्त केला. या चित्रपटात प्रमुख कलाकारांसोबत प्रसाद सुर्वे, अविनाश किर्ती, मिलिंद संगावार, धीरज बिडवे, मनोज चौधरी, गोरक्ष लोखंडे, आदित्य साळुंखे, रोहित भिंगारे, प्रताप कोलते, शीतल पाटील, शीतल ओसवाल, रश्मी व्यहारे आणि आरती पवार हे सहकलाकारही झळकणार आहेत. 'बंधिनी' चित्रपटाचे संगीतकार रोहन पगारे असून संगीत संयोजन प्रशांत शांताराम नांदगावकर यांनी केले आहे. कविता कृष्णमूर्ती, राहुल देशपांडे, वैशाली सामंत आणि देविका पणशीकर यासारख्या मात्तबर गायकांच्या सुरेल स्वरांनी गीतांना 'चारचाँद' लावले आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव अलदरे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

गांव मौजे अलदरे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र. ३३७ वरील जमीन ग.नं. ३३/४ क्षेत्र ०१ हे ५६ आर, आकार ०० रु. ६२ पैसे ही मिळकत श्री. दत्ता गुलाबराव घाडगे यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत आहे. सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे आशिल प्रज्ञा जिनेश, रा. मिरा रोड, ठाणे ४०११०७ यांनी श्री. दत्ता गुलाबराव घाडगे यांचेबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुः सिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. २९/०७/२०२६

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे,
ॲडव्होकेट
मु. पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
ऑफिस - हिन्दू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व्यापारी संकुल, दुसरा मजला, गाळा नं. १९, धान्य बाजार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२,
मोबा. ९७३०८२८७२१.

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/738/25 — दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

नसीम अख्तर अब्दुल सलाम सौदागर, मु. पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार नसीम अख्तर अब्दुल सलाम सौदागर मु. पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांची स्वत: नामे **नसीम अख्तर अब्दुल सलाम सौदागर यांचा जन्म 01.06.1951 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 738/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### नावात बदल

लग्न आधीचे नाव-
गायत्री गोविंद जवाद
पत्ता- फ्लॅट नंबर 5,जानकी प्लाझा,
गोदाम गल्ली, कोपरगाव
लग्नानंतरचे नाव-
गायत्री प्रणव जमदग्नी
सध्याचा पत्ता-
E2307 राहुल डाउन टाऊन पुनावळे

## इमारतींच्या सुरक्षिततेसाठी अग्निरोधक मिनरल पेंट तंत्रज्ञान सादर

■ पुणे (दै. संध्या)




भारतातील निवासी आणि व्यावसायिक इमारतींमध्ये लागणाऱ्या आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, 'झायडेक्स पेंट्स'ने भिंतींच्या पारंपारिक रंग या दुर्लक्षित धोक्याकडे लक्ष वेधले आहे. एनसीआरबीच्या (NCRB) आकडेवारीनुसार, बंदिस्त इमारतींमधील आगीत मृत्यूचे मुख्य कारण ज्वाला नसून विषारी धूर हे असते.

हल्ली वापरले जाणारे पेट्रो-पॉलिमर आधारित ॲक्रेलिक आणि प्लास्टिक-इमल्शन रंग उच्च तापमानात कार्बन मोनॉक्साइड आणि हायड्रोजन सायनाइडसारखे अत्यंत घातक वायू तयार करतात, ज्यामुळे लोकांना सुरक्षित बाहेर पडण्यासाठी वेळ मिळत नाही. या धोक्यावर मात करण्यासाठी झायडेक्सने 'सिलिकेट मिनरल पेंट्स' सादर केले आहेत. पोटॅशियम सिलिकेट आणि खनिजांपासून बनवलेले हे 'क्लास १' दर्जाचे अग्निरोधक रंग अकार्बन्सरूप (Inorganic) असल्याने पेट घेत नाहीत आणि विषारी धूरही सोडत नाहीत.

### शुद्धीपत्रक


**जेजुरी नगरपरिषद, ता. पुरंदर जि. पुणे**
**सन - २०२६-२०२७**

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद, जेजुरी यांचेतर्फे कर विभागाकडे आठवडा बाजार, दैनंदिन बाजार वसुली फी वार्षिक टेंडर सन २०२६-२०२७ करिता ई-लिलाव पद्धतीने दिनांक २९/०७/२०२६ ते ०५/०८/२०२६ या कालावधी पर्यंत मागविण्यात आले होते. परंतु तांत्रिक अडचणी मुळे निविदा अपलोड होऊ शंकली नाही. तरी सदर निविदा सादर करणेस एक दिवसाची मुदतवाढ देणेत आली आहे.तरी निविदा सादर करणेची अंतिम तारीख ०५/०८/२०२६ ऐवजी ०६/०८/२०२६ असे वाजण्यात यावे.

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.जेनपा/कावि/१७५१/२०२६
दिनांक : २९/०७/२०२६

शिक्का

सही/-
(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद, जेजुरी




## ३० उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा गौरव केला

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सॅमसंग इंडिया ने 2025 मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या 9,400 युवकांमधून निवडलेल्या 30 डिओएसटी सेल्स उत्कृष्ट प्रशिक्षणार्थींच्या यशाचा गौरव केला. संघटित रिटेल क्षेत्रातील करिअरसाठी युवकांना तयार करणाऱ्या कंपनीच्या प्रमुख सीएसआर कौशल्य विकास कार्यक्रम सॅमसंग डिओएसटी अंतर्गत या उत्कृष्ट प्रशिक्षणार्थींचा सन्मान करण्यात आला. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला सॅमसंग डिओएसटी हा कार्यक्रम विशेष सेल्स प्रशिक्षणाद्वारे युवकांना रिटेल क्षेत्रातील फ्रंटलाइन करिअरसाठी सक्षम बनवतो. सहभागी प्रशिक्षणार्थींना सरकारमान्य प्रमाणपत्र, प्रत्यक्ष रिटेल वातावरणातील अनुभव आणि व्यावहारिक कार्यस्थळ प्रशिक्षण मिळते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे व आसपासचे परिसरातील लोकांना सदरच्या नोटीसीने जाहीरपणे कळविण्यात येते की,

श्री. पराग भास्कर बेलापूरकर सध्या रा. ओतूर, ता. जुन्नर जि. पुणे ४१२४११ यांचे चुलते के. दिगंबर रामकृष्ण बेलापूरकर यांचा मृत्यु दिनांक ३०/६/१९७१ रोजी गाव मौजे कुसूर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे. तसेच के. दिगंबर रामकृष्ण बेलापूरकर यांच मृत्युपश्चात त्यांचे मृत्युची नोंद नातेवाईकांचे अशिक्षितपणा व दिरंगाईमुळे करण्याचे राहून गेलेले आहे. आजरोजी सर्व कागदपत्रांची पडताळणी करून कै. दिगंबर रामकृष्ण बेलापूरकर यांचे मृत्युची नोंद होणेकरिता सदरचे प्रकरण मा. उपविभागीय अधिकारी सो. उपविभाग जुन्नर- आंबेगाव यांचे कोर्टात दाखल करण्यात आलेले आहे. तसेच कै. दिगंबर रामकृष्ण *बेलापूरकर यांचा मृत्यु दिनांक ३०/६/१९७१ रोजी गाव मौजे कुसूर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे याबाबत मा. निबंधक, जन्म, मृत्यु विवाह नोंदणी कार्यालय, ग्रामपंचायत कुसूर, ता. जुन्नर जि. पुणे यांचे कार्यालयाकडून नोंद आढळून येत नाही असा दाखला प्राप्त झालेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कै. दिगंबर रामकृष्ण बेलापूरकर यांचा मृत्यु दिनांक ३०/६/१९७१ रोजी गाव मौजे कुसूर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे याबाबत कोणाचाही इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून दयावी. अन्यथा सदर बाबत इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध व हरकत नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील कार्यवाही पूर्ण करतील मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

जुन्नर
दि. १२/६/२०२६

ॲड. श्री. किसन द. बिडवई
अमरापुर, ता. जुन्नर जि. पुणे.
मो. ९९६०३२६९८५

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ३०/०७/२०२६ ०२:०० दुपारी ते ०८/०८/२०२६ ०२:०० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ३०/०७/२०२६ ०२:३० दुपारी ते ०८/०८/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १०/०८/२०२६ ०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/275 | पाणीपुरवठा | वानवडी - रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत दुषित पाण्याच्या तक्रारीची निवारण करणे झोपडपट्टी, गुंठेवारी वा इतर भागांनमध्ये पाण्याच्या लाईन बदलणे, कुपनलीका देखभाल दुरुस्तीची व इतर कामे करणे | रू. १३५९/- | रू. १७९८८५२/- | रू. १७९८९/- | १२ | धनाजी घागरे ९०९६०२६३२९ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Atharva Nitin Khutwad
टेंडर लिपिक
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

सही/-
Rajesh Shinde
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्रमांक : १/४६१ दि. २९/०७/२०२६*

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी. डी.एल.-अ.-14072026-274480
CG-DL-E-14072026-274480

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड 3-उप-खण्ड (ii)
PART II Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

स. नं. 3685} नई दिल्ली, सोमवार, जुलाई 13, 2026/आषाढ 22, 1948
No. 3685} NEW DELHI, MONDAY, JULY 13, 2026/ASHADHA 22, 1948

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

### अधिसूचना

नई दिल्ली, 13 जुलाई, 2026

का.आ. 3847 (अ). - केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के पुणे जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या ६१ SPUR के कि.मी. १३+८८० से कि.मी. ६९+८२० जुन्नर-घोडेगाव से तळेघर सेक्शन बंकरफाटा- जुन्नर-घोडेगाव से तळेघर रोड तक के भूखंड का निर्माण (चौडाकरने, पेव्ड शोल्डर सहित चार/दो लेन का बनाने, आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन पुणे जिल्हा पुणे को लिखित रूप मे किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के पुणे जिले मेंराष्ट्रीय राजमार्ग संख्या ६१ SPUR के कि.मी. १३+८८० से कि.मी. ६९+८२० जुन्नर-घोडेगाव से तळेघर सेक्शन बंकरफाटा- जुन्नर-घोडेगाव से तळेघर रोड के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम : महाराष्ट्र | | | जिले का नाम : पुणे | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुका का नाम : आंबेगाव | | | | | |
| गांव का नाम : डिंभे खुर्द | | | | | |
| 1 | 138 | निजी | नम | 0.03 (हेक्टेयर) | 0.03 |
| 2 | 139 | निजी | नम | 0.1445 (हेक्टेयर) | 0.1445 |
| 3 | 140 | निजी | नम | 0.0725 (हेक्टेयर) | 0.0725 |
| 4 | 141 | निजी | नम | 0.057 (हेक्टेयर) | 0.057 |
| 5 | 142 | निजी | नम | 0.0116 (हेक्टेयर) | 0.0116 |
| 6 | 143 | निजी | नम | 0.0363 (हेक्टेयर) | 0.0363 |
| 7 | 144 | निजी | नम | 0.0654 (हेक्टेयर) | 0.0654 |
| 8 | 145 | निजी | नम | 0.0712 (हेक्टेयर) | 0.0712 |
| 9 | 146 | निजी | नम | 0.0645 (हेक्टेयर) | 0.0645 |
| 10 | 147 | निजी | नम | 0.0504 (हेक्टेयर) | 0.0504 |
| 11 | 148 | निजी | नम | 0.0651 (हेक्टेयर) | 0.0651 |
| 12 | 151 | निजी | नम | 0.0218 (हेक्टेयर) | 0.0218 |
| 13 | 158 | निजी | नम | 0.0664 (हेक्टेयर) | 0.0664 |
| 14 | 161 | निजी | नम | 0.0309 (हेक्टेयर) | 0.0309 |
| 15 | 162 | निजी | नम | 0.0196 (हेक्टेयर) | 0.0196 |
| 16 | 163 | निजी | नम | 0.0117 (हेक्टेयर) | 0.0117 |
| 17 | 164 | निजी | नम | 0.0228 (हेक्टेयर) | 0.0228 |
| 18 | 165 | निजी | नम | 0.0136 (हेक्टेयर) | 0.0136 |
| 19 | 167 | निजी | नम | 0.0194 (हेक्टेयर) | 0.0194 |
| 20 | 169 | निजी | शुष्क | 0.0535 (हेक्टेयर) | 0.0535 |
| 21 | 170 | निजी | नम | 0.0121 (हेक्टेयर) | 0.0121 |
| 22 | 171 | निजी | नम | 0.0243 (हेक्टेयर) | 0.0243 |
| 23 | 172 | निजी | नम | 0.0023 (हेक्टेयर) | 0.0023 |
| 24 | 174 | निजी | नम | 0.1541 (हेक्टेयर) | 0.1541 |
| 25 | 24 | निजी | नम | 0.2348 (हेक्टेयर) | 0.2348 |
| 26 | 25 | निजी | नम | 0.081 (हेक्टेयर) | 0.081 |
| 27 | 26 | निजी | नम | 0.111 (हेक्टेयर) | 0.111 |
| 28 | 27 | निजी | नम | 0.0228 (हेक्टेयर) | 0.0228 |
| 29 | 31 | निजी | नम | 0.1041 (हेक्टेयर) | 0.1041 |
| 30 | 41 | निजी | नम | 0.0781 (हेक्टेयर) | 0.0781 |
| 31 | 42 | निजी | नम | 0.0514 (हेक्टेयर) | 0.0514 |
| 32 | 43 | निजी | नम | 0.018 (हेक्टेयर) | 0.018 |
| 33 | 44 | निजी | नम | 0.0264 (हेक्टेयर) | 0.0264 |
| 34 | 45 | निजी | नम | 0.0318 (हेक्टेयर) | 0.0318 |
| 35 | 54 | निजी | नम | 0.0129 (हेक्टेयर) | 0.0129 |
| 36 | 58 | निजी | नम | 0.021 (हेक्टेयर) | 0.021 |
| 37 | 59 | निजी | नम | 0.1984 (हेक्टेयर) | 0.1984 |
| 38 | 69 | निजी | नम | 0.032 (हेक्टेयर) | 0.032 |
| 39 | 70 | निजी | नम | 0.0918 (हेक्टेयर) | 0.0918 |
| 40 | 83 | निजी | नम | 0.0092 (हेक्टेयर) | 0.0092 |
| 41 | 85 | निजी | नम | 0.0803 (हेक्टेयर) | 0.0803 |
| 42 | 86 | निजी | शुष्क | 0.0152 (हेक्टेयर) | 0.0152 |
| 43 | 87 | निजी | नम | 0.01 (हेक्टेयर) | 0.01 |
| 44 | 88 | निजी | नम | 0.01 (हेक्टेयर) | 0.01 |
| | | | | Total | 2.3612 |

[फा. सं. NH-15017/24/2024-P&M/3A]
शेख अमीनखान, निदेशक

# MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS

## NOTIFICATION

**New Delhi, the 13th July, 2026**

**S.O. 3847(E).** - In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for Building (widening/Two lane with paved shoulder/Four laning etc) maintenance, management and operation of National Highway No. 61 SPUR in the stretch of land from Km.13+880 to Km 69+820 Junnar-Ghodegaon to Taleghar Section Bankarphata-Junnar-Ghodegaon to Taleghar Road in the District of Pune in the state of Maharashtra

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, The Deputy Collector, Land Acquisition Pune, District Pune in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

**Brief description of the land to be acquired, with or without structure falling National Highway No. 61 SPUR within the stretch of the land from Km.13+880 to Km.69+820 Junnar-Ghodegaon to Taleghar Section Bankarphata-Junnar-Ghodegaon to Taleghar Road in the District of Pune in the state of Maharashtra.**

| State: MAHARASHTRA | | | District: PUNE | | |
|---|---|---|---|---|---|
| SR. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluk: Ambegaon | | | | | |
| Village: Dimbhe Khurd | | | | | |
| 1 | 138 | Private | Wet | 0.03 (Hectares) | 0.03 |
| 2 | 139 | Private | Wet | 0.1445 (Hectares) | 0.1445 |
| 3 | 140 | Private | Wet | 0.0725 (Hectares) | 0.0725 |
| 4 | 141 | Private | Wet | 0.057 (Hectares) | 0.057 |
| 5 | 142 | Private | Wet | 0.0116 (Hectares) | 0.0116 |
| 6 | 143 | Private | Wet | 0.0363 (Hectares) | 0.0363 |
| 7 | 144 | Private | Wet | 0.0654 (Hectares) | 0.0654 |
| 8 | 145 | Private | Wet | 0.0712 (Hectares) | 0.0712 |
| 9 | 146 | Private | Wet | 0.0645 (Hectares) | 0.0645 |
| 10 | 147 | Private | Wet | 0.0504 (Hectares) | 0.0504 |
| 11 | 148 | Private | Wet | 0.0651 (Hectares) | 0.0651 |
| 12 | 151 | Private | Wet | 0.0218 (Hectares) | 0.0218 |
| 13 | 158 | Private | Wet | 0.0664 (Hectares) | 0.0664 |
| 14 | 161 | Private | Wet | 0.0309 (Hectares) | 0.0309 |
| 15 | 162 | Private | Wet | 0.0196 (Hectares) | 0.0196 |
| 16 | 163 | Private | Wet | 0.0117 (Hectares) | 0.0117 |
| 17 | 164 | Private | Wet | 0.0228 (Hectares) | 0.0228 |
| 18 | 165 | Private | Wet | 0.0136 (Hectares) | 0.0136 |
| 19 | 167 | Private | Wet | 0.0194 (Hectares) | 0.0194 |
| 20 | 169 | Private | Dry | 0.0535 (Hectares) | 0.0535 |
| 21 | 170 | Private | Wet | 0.0121 (Hectares) | 0.0121 |
| 22 | 171 | Private | Wet | 0.0243 (Hectares) | 0.0243 |
| 23 | 172 | Private | Wet | 0.0023 (Hectares) | 0.0023 |
| 24 | 174 | Private | Wet | 0.1541 (Hectares) | 0.1541 |
| 25 | 24 | Private | Wet | 0.2348 (Hectares) | 0.2348 |
| 26 | 25 | Private | Wet | 0.081 (Hectares) | 0.081 |
| 27 | 26 | Private | Wet | 0.111 (Hectares) | 0.111 |
| 28 | 27 | Private | Wet | 0.0228 (Hectares) | 0.0228 |
| 29 | 31 | Private | Wet | 0.1041 (Hectares) | 0.1041 |
| 30 | 41 | Private | Wet | 0.0781 (Hectares) | 0.0781 |
| 31 | 42 | Private | Wet | 0.0514 (Hectares) | 0.0514 |
| 32 | 43 | Private | Wet | 0.018 (Hectares) | 0.018 |
| 33 | 44 | Private | Wet | 0.0264 (Hectares) | 0.0264 |
| 34 | 45 | Private | Wet | 0.0318 (Hectares) | 0.0318 |
| 35 | 54 | Private | Wet | 0.0129 (Hectares) | 0.0129 |
| 36 | 58 | Private | Wet | 0.021 (Hectares) | 0.021 |
| 37 | 59 | Private | Wet | 0.1984 (Hectares) | 0.1984 |
| 38 | 69 | Private | Wet | 0.032 (Hectares) | 0.032 |
| 39 | 70 | Private | Wet | 0.0918 (Hectares) | 0.0918 |
| 40 | 83 | Private | Wet | 0.0092 (Hectares) | 0.0092 |
| 41 | 85 | Private | Wet | 0.0803 (Hectares) | 0.0803 |
| 42 | 86 | Private | Dry | 0.0152 (Hectares) | 0.0152 |
| 43 | 87 | Private | Wet | 0.01 (Hectares) | 0.01 |
| 44 | 88 | Private | Wet | 0.01 (Hectares) | 0.01 |
| | | | | Total | 2.3612 |

[F. No. NH-15017/24/2024-P&M/3A]
SHAIKH AMINKHAN, Director

जिमाका/पुणे/जाहिरात/१६७/२०२६-२७



## पिंपळे सौदागर येथे कारगील विजय दिनानिमित्त

# शहीद वीरांना अभिवादन, वीर पत्नींचा सन्मान

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपळे सौदागर येथे उन्नती सोशल फाउंडेशन, यशसिद्धी, आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन आणि माजी सैनिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने कारगील विजय दिनानिमित्त शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी कारगील युद्धात राष्ट्रासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर जवानांच्या वीर पत्नी – मंगला साळुंके, जयश्री धनवडे, पद्मिनी भालेराव, नैना सकट आणि प्रतिमा भाटे यांचा शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेला मानाचा मुजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श प्रत्येकाने जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.

गरसेविका डॉ. कुंदा भिसे यांनी सांगितले की, राष्ट्रासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांचे प्रेरणादायी कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्या मनात राष्ट्रभक्तीची भावना दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमात पी. के. इंटरनॅशनल स्कूल, चॅलेंजर पब्लिक स्कूल आणि अण्णासाहेब मगर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, नाटिका व विविध सादरीकरणांद्वारे उपस्थितांच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित केली. यावेळी मेजर जनरल सुधाकर चिन्नावार, कॅप्टन बाबू पोलके, ह.भ.प. विजूशेठ जगताप, भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे, स्नेहा कलाटे, जयनाथ काटे, जगन्नाथ काटे, संस्थापक संजय भिसे, संतोष वानखेडे आदी मान्यवरांच्या हस्ते कारगील विजय स्तंभाच्या प्रतिकृतीस पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना अभिवादन करण्यात आले.

# २ चिमुकल्या सख्ख्या बहिणींवर अत्याचार

## ६५ वर्षीय आरोपीला अटक

■ पिंपरी (दै. संध्या)

चिमुकल्या सख्ख्या बहिणींवर अत्याचार झाल्यानं पिंपरी चिंचवड शहर हादरलंय. शेजारी राहणाऱ्या ६५ वर्षीय नराधमाने हे कृत्य केलंय. याप्रकरणी रमजान बागवान याला वाकड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

नराधमाने दहा वर्षीय पीडितेवर दीड महिन्यात चार वेळा आणि चार वर्षीय पीडितेवर एकदा अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी नराधमावर पॉक्सो आणि एट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेचे आई-वडील, शेजारीचं राहणारे आज्जी-आजोबा आणि काका मजुरी करतात. याचं पीडित कुटुंबाच्या बाजूला राहणारा नराधम, त्याची पत्नी आणि त्याचा मुलगा हे मजुरीचं काम करतात.

चौथीत शिकणारी दहा वर्षीय पीडिता नेहमीप्रमाणे आज सकाळी आठ वाजता शाळेत गेली. अकरा वाजता ती घरी येईपर्यंत आई-वडील आणि शेजारी राहणारे आज्जी-आजोबा काका असे सगळेच कामावर गेले होते. शेजारी राहणाऱ्या नराधमाची बायको आणि मुलगा ही मजुरी करायला गेले, नराधम मात्र घरीचं थांबला होता. त्यावेळी दहा वर्षीय चिमुकली आणि तिची चार वर्षीय बहीण घरातली आवराआवर करत होते. दुपारच्या वेळी दहा वर्षीय चिमुकली कपडे धुण्यासाठी बाहेर आली, त्यावेळी नराधमाने आजूबाजूला कोणी नाही याची खात्री केली आणि पीडितेचे तोंड दाबून लगतच्या स्वतःच्या घरी घेऊन गेला. हे शेजारच्या एका महिलेनं पाहिलं. ही महिला पीडितेच्या आई-वडील कामावरून कधी येतायेत याची वाट पाहत राहिली. संध्याकाळी ते घरी येण्यापूर्वी नराधमाने अत्याचार करुन पीडितेला सोडून दिलं होतं. मात्र घरच्यांना सांगितलं तर चाकूने पोट कापेन अशी धमकी या नराधमाने चिमुकल्या पीडितेला दिली होती.

मात्र शेजारच्या महिलेने पीडितेच्या आई-वडिलांना गाठलं, दुपारी जे घडलं ते सांगितलं. मग पीडितेच्या आईने विश्वासात घेऊन विचारलं असता, तिने आजचा घडलेला प्रकार सांगितला. इतकंच नव्हे तर मे महिन्यात पहिल्यांदा आणि त्यानंतर तीन वेळा असं एकूण चार वेळा तोंड दाबून नराधम घेऊन गेला अन अत्याचार केला. असं पिडीतीने सांगताच, आईसह सर्व कुटुंबाला मोठा धक्का बसला.

# ‘साहित्यरत्न दौड’ आणि महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन

■ पिंपरी (दै. संध्या)

“साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजाला प्रेरणा देणारे आणि परिवर्तनाची दिशा दाखविणारे आहेत. त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित ‘साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६ यंदापासून सात दिवस विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार आहे. प्रथमच आयोजित करण्यात येणारी ‘साहित्यरत्न दौड’ ही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारी आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारी ठरेल. तसेच महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेमुळे राज्यातील व जिल्ह्यातील खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्याची उत्तम संधी मिळेल. नागरिकांनी या दोन्ही उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व,तसेच या पर्वांतर्गत प्रथमच ‘साहित्यरत्न दौड २०२६’ या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर माजी नगरसदस्य दिवंगत सोपानराव भोईर यांच्या स्मरणार्थ १९ वी महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०२६ देखील आयोजित करण्यात आली आहे यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करण्यात आलेली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

# शहरी पूरग्रस्तांना दिलासा मिळणार

## ४८ तासांची’ तांत्रिक अट रद्द होणार

■ पिंपरी (दै. संध्या)

पूरग्रस्तांना शासकीय भरपाई मिळण्यातील सर्वात मोठा प्रशासकीय अडथळा दूर होणार आहे. पुराचे पाणी २४ तासांत ओसरले तरी नागरिकांचे झालेले प्रचंड आर्थिक नुकसान लक्षात घेता, मदतीसाठी असलेली ‘किमान ४८ तास पाणी साचून राहण्याची’ अन्यायकारक अट रद्द केली जाणार आहे. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केलेल्या आग्रही पाठपुराव्याला यश आले असून, लवकरच पुनर्वसन अतिरिक्त मुख्य सचिव यांच्यासमवेत बैठक घेऊन आवश्यक दुरुस्ती करण्याचे सकारात्मक आश्वासन महसूलमंत्र्यांनी दिले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ५ आणि ६ जुलै २०२६ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पवना व मुळा नद्यांना पूर आला होता. त्यामुळे रावेत, चिखली, पिंपरी, सांगवी, पिंपळे गुरव, दापोडी, काळेवाडी, बोपखेल आणि भाटनगर यांसारख्या सखल भागांतील शेकडो घरांमध्ये ४ ते ५ फूट पाणी शिरले.

प्रशासनाने ९३३ कुटुंबांतील ४ हजार २०० हून अधिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले. मात्र, अवघ्या काही तासांत नागरिकांचे धान्य, कपडे, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वाहने आणि व्यापाऱ्यांच्या दुकानांतील लाखो रुपयांचा माल पाण्यात भिजून उद्ध्वस्त झाला. हीच परिस्थती अनेक शहरी भागात सुद्धा दिसून आली.

# मतदार यादीत नाव निश्चित करण्यासाठी ८ ऑगस्टपर्यंत गणना अर्ज भरा

■ पिंपरी (दै. संध्या)

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) – २०२६ कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघांतील सर्व पात्र नागरिकांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना अर्ज भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केले आहे.

वेळेत अर्ज सादर करणाऱ्या पात्र मतदारांची नावे १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, या मोहिमेअंतर्गत बीएलओंकडून घरभेटी देत गणना अर्जांचे वितरण व संकलन सुरू आहे.

शहरातील प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव समाविष्ट व्हावे, यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यासंदर्भात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, “लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शहरातील सर्व पात्र नागरिकांनी गणना अर्ज वेळेत भरून संबंधित बीएलओकडे जमा करावा. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या नावाची खात्री करून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावे अथवा हरकती दाखल कराव्यात. एकही पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.”

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना म्हटले की, “विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची अंमलबजावणी शहरात नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. बीएलओंना आवश्यक सहकार्य करून नागरिकांनी गणना अर्ज वेळेत सादर करावेत. ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे.” गणना अर्ज वेळेत भरून सादर करणाऱ्या नागरिकांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत.

# पाणी कपात तात्काळ रद्द करा, अन्यथा आंदोलन : चिखले

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील सुरू असलेली १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करून पूर्ण दाबाने नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

पवना धरणातील जलसाठा पूर्ण क्षमतेने भरलेला असून धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू असतानाही शहरात लागू असलेली १५ टक्के पाणी कपात कायम ठेवण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. २०१८-१९ पासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा व्यवस्था सुरू असून ती तात्पुरती असल्याचे प्रशासनाने सांगितले होते. मात्र सात ते आठ वर्षे उलटून गेल्यानंतरही नागरिकांना नियमित व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा मिळत नसल्याचा आरोप मनसेने केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी पवना धरणातील जलसाठा १५ ते २० टक्क्यांवर आल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पाणी कपात लागू करण्यात आली होती. मात्र सध्या मुसळधार पावसामुळे धरण १०० टक्के भरले असूनही कपात कायम असल्याने अनेक सोसायट्या, निवासी संकुले आणि बैठ्या घरांमध्ये अत्यल्प दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन





गरजांवर परिणाम होत असून मोठ्या प्रमाणात गैरसोय निर्माण होत आहे. मनसेने महापालिका प्रशासनाकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. यामध्ये १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करणे, शहराला पूर्ण क्षमतेने व पुरेशा दाबाने नियमित पाणीपुरवठा सुरू करणे आणि सिंचन विभाग व महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये प्रभावी समन्वय निर्माण करून जलसाठ्याच्या परिस्थितीनुसार तातडीने निर्णय घेण्याची कार्यपद्धती विकसित करणे या मागण्यांचा समावेश आहे. दरवर्षी धरण पूर्ण भरल्यानंतर लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक संघटनांच्या पाठपुराव्यानंतरच पाणी कपात मागे घेण्याचा निर्णय का घेतला जातो, असा सवालही मनसेने उपस्थित केला आहे.

दरम्यान, ४८ तासांच्या आत पाणी कपात मागे घेऊन नियमित पाणीपुरवठा सुरू न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सचिन चिखले यांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### महापालिकेच्या वतीने ई-आरटीएस प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (ई-आरटीएस) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक प्रशासकीय आणि तांत्रिक कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली. मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पिंपरी चिंचवड शहरासाठी ई-आरटीएस आणि हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रूट (एचसीएमटीआर) प्रकल्पाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या स्तरावर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भातील पुढील कार्यवाही, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, तांत्रिक नियोजन तसेच प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीमध्ये ई-आरटीएस प्रकल्पाच्या प्रायोगिक टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक विभागीय समन्वय वाढविणे, तांत्रिक बाबींची पूर्तता करणे, विविध यंत्रणांशी समन्वय साधणे आणि नियोजित कालावधीत प्रकल्प सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ई-आरटीएस ही अत्याधुनिक, पूर्णतः इलेक्ट्रिक आणि उच्च क्षमतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून, शहरातील मेट्रो, बीआरटी, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी प्रभावी जोडणी निर्माण करण्यास ती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणात घट होण्यास, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यास तसेच नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून ई-आरटीएस प्रकल्पाला अपेक्षित गती देण्यासाठी महानगरपालिका सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही पार पाडण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

### पिंपरीगावातून गाय चोरीला; घटना सीसीटीव्हीत कैद

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरीगावातील वैभवनगर परिसरातून मध्यरात्री तीन अज्ञात चोरट्यांनी रस्त्यावरून गाय चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. अवघ्या काही मिनिटांत सुमारे २० हजार रुपये किमतीची गाय घेऊन चोरट्यांनी पोबारा केला. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात तीन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीव्हीच्या आधारे त्यांचा शोध सुरू आहे. याप्रकरणी अभिजीत ज्ञानेश्वर शिंदे (वय ३७, रा. मंजुळ दामोदर निवास, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोर, पिंपरीगाव) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २८ जुलै रोजी पहाटे १.४५ वाजण्याच्या सुमारास वैभवनगर येथील रेणुका कडबाकुट्टी केंद्र व जगदंबा स्विटहोमच्या शेजारी घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिघा अज्ञात चोरट्यांनी संगनमत करून काळ्या-पांढऱ्या रंगाची गोवंश जातीची गाय चोरून नेली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयितांची हालचाल कैद झाली असून, त्याआधारे तपास सुरू आहे. फुटेजमध्ये दिसणाऱ्या संशयितांपैकी एकाने काळी हाफ पॅन्ट, काळे सँडो बनियन आणि काळी टोपी घातली होती. दुसऱ्याने काळी श्री-फोर्थ पॅन्ट आणि राखाडी रंगाचा टी-शर्ट परिधान केला होता. तर तिसऱ्या व्यक्तीने काळी पॅन्ट आणि राखाडी रंगाचा शर्ट घातल्याचे दिसून आले आहे. घटनेची माहिती मिळताच पिंपरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करून पुरावे संकलित करण्यात आले. आरोपींचा माग काढण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांची तपासणी सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चिरंजीव दलालवाड करत आहेत.

### आठ दिवसांत दुरुस्ती न झाल्यास ‘भावपूर्ण श्रद्धांजली’ आंदोलनाचा इशारा

पिंपरी : दैनिक संध्या

प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगर स्पाईन रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सततच्या पावसामुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. येत्या आठ दिवसांत या रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास ‘भावपूर्ण श्रद्धांजली’ आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मारूती जाधव यांनी दिला आहे. मारूती जाधव यांनी म्हटले आहे की, परिसरात अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहतूक धोकादायक बनली आहे. दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे तातडीने खड्ड्यांची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षीही याच स्पाईन रोडवरील खड्ड्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मारुती जाधव मित्रपरिवाराच्या वतीने खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून अनोखे आंदोलन करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यंदाच्या पावसाळ्यात पुन्हा एकदा रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात सुमारे ५६० खड्डे असल्याचा दावा केला असून खड्डे दुरुस्तीसाठी गेल्या वर्षभरात सुमारे १५० कोटी खर्च केल्याचे सांगितले आहे. मात्र, रस्त्यांची सद्यस्थिती पाहता हा निधी नेमका कुठे खर्च झाला, याची वरिष्ठ स्तरावर चौकशी व्हावी, अशी मागणी मारुती जाधव यांनी केली आहे. येत्या आठ दिवसांत कृष्णानगर स्पाईन रोडवरील खड्ड्यांची दुरुस्ती न झाल्यास नागरिकांच्या सहभागातून खड्ड्यांचे ‘भावपूर्ण श्रद्धांजली’ आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मारुती जाधव यांनी दिला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन याकडे किती गांभीर्याने पाहते, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### मोशी दुर्घटनेप्रकरणी अधिकारी निलंबित; विभागीय चौकशीचे आदेश

पिंपरी : दैनिक संध्या

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिकेने आणखी एक प्रशासकीय कारवाई केली आहे. तत्कालीन उपअग्निशमन केंद्र अधिकारी ऋषिकांत हिरामण चिपाडे यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हा आदेश जारी केला आहे. या दुर्घटनेप्रकरणी यापूर्वी पर्यावरण विभागाचे प्रमुख संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरोधातही विभागीय चौकशी सुरू आहे. चिपाडे यांनी प्रशासनिक इमारतीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करता आणि मंजूर आराखड्याची पडताळणी न करताच अंतिम अग्निसुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र (फायर एनओसी) दिल्याचा आरोप आहे. प्रत्यक्ष उभारण्यात आलेले बांधकाम आणि मंजूर आराखड्यात मोठी तफावत असतानाही त्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली नाही. या हलगर्जीपणामुळे अनधिकृत अतिरिक्त बांधकामावर वेळेत कारवाई झाली नाही आणि ८ जुलै रोजी कचऱ्याचा ढिगारा कोसळून इमारत पडल्याने नऊ कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला, असा ठपका आदेशात ठेवण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाहतूक कोंडीमुळे कामगार आले रडकुंडीला

**चाकण: दैनिक संध्या**

रस्त्यांची दुरावस्था, कचरा, वाहतूक कोंडी व अवैध पार्किंगमुळे कामगार दररोज मरणयातना सहन करत आहेत. चिंबळी फाटा ते चाकण या दरम्यान दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन चार किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागत असल्यामुळे नागरिक व कामगारांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. चाकण भागात विकासाचा गतीशिल महामार्ग म्हणून पुणे - नाशिक महामार्गाचे प्राधान्याने नाव घेतले जाते. रस्त्यांची दुरावस्था व वाहतूक कोंडीमुळे सर्वांचाच श्वास गुदमरला आहे. ओव्हरटेकचा प्रयत्न व नियोजनाचा अभाव यामुळे आळंदी फाटा, चाकण चौक, कुरुळी फाटा, चिंबळी फाटा या दरम्यान वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने पुणे, पिंपरी व चिंचवड शहरातील ये - जा करणारे नोकरदार वर्ग या वाहतूक कोंडीने प्रचंड हैराण झाले आहेत. चाकण परिसरातील आळंदी फाटा, कुरुळी, निघोजे, चिंबळी फाटा या परिसरात अनेक लहान मोठ्या कंपन्या, गोदामे असून, अशा कंपन्यात कच्चा माल घेऊन येणारी वाहने महामार्गावर उभी केली जात आहेत. तर काही वाहनांना कंपनीमध्ये जागा नाही असे सांगून दोन - तीन दिवस बाहेर ठेवले जाते. त्यामुळे अन्य राज्यांतून आलेले वाहनचालक रस्त्याच्या कडेला वाहने उभी ठेवत असल्याने हा रस्ता अपुरा ठरत आहे. कामासाठी जाणाऱ्या कामगारांना कंपन्याकडून बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु या बस चालकांकडून देखील नियमांची पायमल्ली होत आहे.

### किल्लेदारांची गुरुवारी आढावा बैठक

**चाकण : दैनिक संध्या**

किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने चाकण येथे गुरुवारी (दि.३०) किल्लेदारांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या येथील प्राथमिक शाळेसमोर ऐतिहासिक संग्रामदुर्ग किल्ला आहे. या किल्ल्यात नेहमी सामाजिक उपक्रम सुरू असतात. श्रीकृष्ण जन्माष्टमी व स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी गुरूवारी (दि.३०) सकाळी दहा वाजता येथील किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, श्रीराम सोसायटी, शिक्रापूर रोड, चाकण या ठिकाणी या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण पंचक्रोशीतील किल्लेदारांनी व चाकणकर ग्रामस्थांनी या आढावा बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके व ॲड. किशोर झिजुंरके यांनी केले आहे.

### रस्त्यावरील खड्ड्यांमुळे ट्रॉली पलटी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर खड्ड्यांमुळे आळे परिसरातील रस्त्यावर एक भीषण अपघात घडल्याचे समोर आले आहे. रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांमुळे एक ट्रॅक्टरची ट्रॉली अचानक उलटली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु यामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे विस्कळीत झाली होती.या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सध्या महामार्गावरील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून ठिकठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. संबंधित विभागाने या खड्ड्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. अपघाताची माहिती मिळताच आळेगावचे सरपंच मुकुंद भंडलकर यांच्यासह ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि ट्रॅक्टरची ट्रॉली बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी मदत केली. या घटनेनंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने हे खड्डे बुजवून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी केली आहे. वारंवार सूचना करूनही जर रस्त्याची दुरुस्ती केली नाही, तर नागरिकांच्या सहभागातून तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच मुकुंद भंडलकर यांनी दिला आहे.

### ३,२६६ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**नारायणगाव : दैनिक संध्या**

नारायणगाव : जुन्नर तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यशोक अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजना 2026' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वेगाने कार्यवाही सुरू झाली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये तालुक्यातील 121 गावांमधील एकूण 3,266 पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली. पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकांमध्ये आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयामध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यादीतील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या महा ई-सेवा केंद्रात किंवा आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन मुदतीपूर्वी आपले आधार प्रमाणीकरण करावे. शेतकऱ्यांनी याद्यांमध्ये आपले नाव तपासून आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे सरकार विभागाने स्पष्ट केले आहे.तसेच सर्व पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जुन्नरचे सहाय्यक निबंधक डॉ. गजेंद्र देशमुख यांनी केले आहे. मुदतीपूर्वी आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्यासच कर्जमुक्ती योजनेची प्रक्रिया सुरळीत होणार असल्याने शेतकऱ्यांनी तात्काळ ही प्रक्रिया पूर्ण करावी. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुक्यात वेगाने काम सुरू आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचा विलंब न करता आवश्यक कागदपत्रे सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**नारायणगाव : दैनिक संध्या**

नारायणगाव :शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त युवासेनेच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय निमगाव सावा येथे वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम उत्साहात संपन्न झाला. जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे अवचित्य साधून हा केवळ संदेश नसून भावी पिढीप्रती आपली जबाबदारी आहे, या भावनेतून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून हरित महाराष्ट्राचा संकल्प करण्यात आला. या वेळी युवासेना उपजिल्हा प्रमुख मा.शांतारामशेठ सावंत तसेच युवासेना तालुका प्रमुख मा.मयूरशेठ गुंजाळ तसेच शिवसेना तालुका प्रमुख मा. भास्करशेठ गाडगे यांच्या नेतृत्वात करण्यात आला. यावेळी युवासेना उपतालुका प्रमुख मा.अभिषेक भाऊ गवळी, प्रसिद्धीप्रमुख मा. प्रसाद भाऊ बनकर,मा.वैभव शेठ चौगुले, मा.सिद्धेश भाऊ सोनवणे,मा.सचिन शेठ गाडगे आणि मा.गणेश आबाजी गाडगे मा. विनायक भाऊ आतकरी, मा विनायक दाते सर, मा.आशुतोष शिरतर सर तसेच सर्व युवासिनीका यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. वृक्षारोपण हीच भावी पिढीसाठी खरी भेट आहे.समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि जनसेवा हीच शिवसेनेची परंपरा जपत युवासेना सातत्याने जनकल्याणाचे उपक्रम राबवत राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



# भिवडी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

■ पुरंदर (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याच्या उद्देशाने श्री मार्तंड देवस्थान ट्रस्ट, जेजुरी यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा भिवडी (ता.पुरंदर)येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दप्तरांचे वाटप करण्यात आले.

भिवडी गावातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळावे,यासाठी छत्रपती संभाजी महाराज ग्रामविकास प्रतिष्ठान भिवडी यांनी श्री मार्तंड देवस्थान ट्रस्टकडे विशेष मागणी केली होती. त्यांच्या मागणीनुसार दखल घेत ट्रस्टने हा उपक्रम राबविला.

या कार्यक्रमास देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त पोपटराव खोमणे, मंगेश घोणे, दिलीपनाना वांढेकर, बंडाशेठ पवार,विठ्ठलआबा मोकाशी,

दादासाहेब दिघे, सागर मोकाशी, बाबुशेठ जैनक, सुशांत भांडवलकर निलेश पवार, केतन मोकाशी युवराज बोरकर, भैय्यासाहेब खोमणे, विलास खटाटे,मधुकर चव्हाण, सुरेश मोकाशी, शांताराम जैनक, सुनिल क्षीरसागर, नारायण दिघे,योगेश मोकाशी,संदीप मोकाशी, नाना खोमणे आदीसह भिवडीकर ग्रामस्थ, शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. श्री मार्तंड देवस्थान ट्रस्टकडून सातत्याने राबविण्यात येणारे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या स्तुत्य कार्याबद्दल उपस्थितांनी ट्रस्टचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन केले.

## अध्यक्षपदी सुनिता सोरटे

■ वाल्हे (दै. संध्या)

चाकण येथील चाकण लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी सुनिता सुरेश सोरटे यांची, तर सीमा गणेश कड यांची सचिवपदी निवड करण्यात आली. अनुबंध सेवेचा... वारी समर्पणाची... या संकल्पनेवर आधारित चाकण लायन्स क्लब कार्यरत आहे. मल्टिपल कौन्सिलचे चेअरमन फत्तेचंद रांका यांच्या हस्ते चाकण लायन्स क्लबच्या नविन पदाधिकाऱ्यांना आपापले अधिकार प्रदान करण्यात आले. आनंद आंबेकर व डॉ. दिपक शहा यांनी नवीन सदस्यांचे कौतुक केले. याप्रसंगी झोन चेअरपर्सन विशाल गोस्वामी, पदग्रहण समारंभाचे अध्यक्ष प्रकाश मुटके, व्हाईस चेअरमन अपर्णा कानडे, नगरसेवक धीरज मुटके, माजी अध्यक्ष सुरेश कानडे, अक्षय जाधव, ऐश्वर्या जाधव, बाळासाहेब मुटके, सुलोचना शिर्के, सुनील पठारे, उल्हास शिर्के, लक्ष्मण नाणेकर, गणेश कड, अविनाश सोनवणे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या



संख्येने उपस्थित होते.सुनिता सोरटे यांनी सांगितले की,"अध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत चाकण लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजाची सेवा करताना भूखमुक्ती, मधुमेह नियंत्रण, दृष्टी सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, बालपण कर्करोग निदान, रक्तदान शिबिर, नेत्रदान शिबिर, सर्व प्रकारची शिबिरे घेण्यात येणार आहेत." यावर्षीच्या संचालक मंडळामध्ये धीरज मुटके, दिलीप परदेशी, प्रकाश मांजरे, डॉ. रमेश जाधव, सुवर्णा मुटके, अशोक शेवकरी, तुषार गोरे, विलास मांजरे, शंकर गवते, डॉ. रश्मी जाधव, सुरेश सोरटे आदींचा समावेश आहे.

## मुंबईत भारतीय पत्रकार संघाची वार्षिक महासभा उत्साहात

■ वाल्हे (दै. संध्या)

पत्रकारांचे राष्ट्रीय कुटुंब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय पत्रकार संघाची १२ वी वार्षिक राष्ट्रीय महासभा मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील नवनीत गुजराथी समाज भवनात मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन सी.डब्लू.सी. कॉलेजचे प्राचार्य अजय कौल यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष विक्रम सेन यांना भूषविण्यात आले होते.

या वार्षिक महासभेत भारतातील प्रत्येक राज्यातील ए.आय.जे.च्या संघटनात्मक कार्यासह पत्रकारांची सुरक्षा पत्रकारांच्या मुलांसाठी उच्चस्तरीय शिक्षणात सवलत, आरोग्य सेवा तसेच पत्रकारांसाठी कार्यान्वित असलेल्या




कल्याणकारी योजनांबाबत सखोल चर्चा करून आगामी ध्येय धोरणांचा आढावा देखील घेण्यात आला.

यावेळी पत्रकार संघात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख कमलेश शेवाळे नागपूरच्या सविता कुलकर्णी पुणे जिल्हाध्यक्ष तैनुर शेख सातारा विभागाचे विकास शिंदे लातूरचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय परळकर धाराशिव जिल्हा प्रमुख उमेश काळे पूर्व खान्देशचे विभाग प्रमुख हेमकांत गायकवाड परभणीचे राजकुमार मुंढे अहिल्यानगर जिल्हा प्रमुख शरद परदेशी बारामती तालुक्याचे अध्यक्ष मधुकर बनसोडे माजी अध्यक्ष विनोद गोलांडे पुणे शहराध्यक्ष प्रवीण जाधव हल्ला कृती समिती प्रमुख आप्पासो तांबे लीगल विंगचे पांडुरंग ढोरे संदीप कांबळे उपस्थित होते.

## थेऊर-आव्हाळवाडी जि. प. गटाचा कायापालट करणार : कोमल संदेश आव्हाळे

■ कोरेगावमुळ, (दै. संध्या)

थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटातील सर्व गावांमध्ये असणाऱ्या रस्त्यांची आम्ही पाहणी करुन ज्या रस्त्यांवर छोटे, मोठे खड्डे पडलेले आहेत ते बुजविण्यासाठी आमचा प्रथम प्रयत्न असून जे रस्ते पूर्णपणे खराब दुरवस्थेत आहेत. त्या रस्त्यांचे नूतनीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी आम्ही वेळोवेळी पाठवपुरवा करीत आहोत. तसेच रस्त्यांवर जेथे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याची गरज आहे त्याठीकांनचे रस्ते आम्ही सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे करुन घेत आहोत. तर गटातील गावांमधील रस्त्यांची कामे एकदम मजबूत भक्कम दर्जेदार करण्यासाठी आमचा मानस आहे. तसेच रस्त्यांच्या कामांसाठी इतरत्र सर्व कामांसाठी वरिष्ठ शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करून जास्तीत जास्त कामे मंजूर करण्यासाठी व निधी मंजूर करण्यासाठी आम्ही काम करीत आहे. यानुसार पुढील कालावधीत थेऊर-आव्हाळवाडी जि.प.गटाचा कायापालट करणार असल्याचे माहिती देताना जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे यांनी सांगितले. आव्हाळवाडी-मांजरी काही अंतरावरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम चालू झाले असून या रस्त्याच्या कामाची पाहणी प्रसंगी जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे प्रतिक्रिया देताना बोलत होत्या. येथे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम चालू झाल्याने रस्त्याच्या कामासाठी आव्हाळवाडी-मांजरी रस्ता तात्पुरत्या स्वरूपात बंद ठेवण्यात आला आहे. यामध्ये वाहनचालकांनी सहकार्य करून काम पूर्ण होईपर्यंत इतरत्र रस्ता मार्गाचा वापर करावा असे आवाहन वाहन चालकांना करण्यात आले आहे. बऱ्याच महिन्यांपासून निधी अभावी रखडलेले हे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडे जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला.त्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडून मंजूर होत आता सद्यस्थितीत सुरू झाले आहे.

मांजरी-आव्हाळवाडी हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण कामासाठी तात्पुरत्या स्वरूपात बंद केला असून, या काही अंतरावरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण काम भक्कम दर्जेदार करून हा रस्ता येत्या १५ दिवसांच्या कालावधीत वाहतुकीसाठी खुला करणार आहोत. यासाठी अतोनात आम्ही प्रयत्न करीत आहे.त्यामुळे वाहनचालकांनी व ग्रामस्थांनी हे काम सुरू असताना सहकार्य करणे गरजेचं आहे. - किरण उंद्रे,कॉन्ट्रॅक्टर तथा इंजिनिअर, पुणे.

सदर रस्त्याचे काम अनेक महिने रखडल्याने वाहन चालकांना अडचणींचा त्रास होत होता.परंतु आता येत्या १५ दिवसांच्या काळात काम पूर्ण होत असल्याने वाहनचालक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

■ नारायणगाव (दै. संध्या)

मीना नदीला आलेल्या पुरामुळे शेत जमिनीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी. या प्रमुख मागणीसाठी इतर मागण्यांसाठी पिंपळगाव तर्फे नारायणगाव येथे मीना नदीपात्रात स्वाभिमानी शेतकरी संघटना व ग्राहक कल्याण फाउंडेशन शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी जलसमाधी आंदोलन करण्यात आले. दरम्यान पुढील आठ दिवसांत आमदार शरद सोनवणे यांच्या उपस्थितीत महसूल, तहसीलदार, जलसंपदा व भूमी अभिलेख विभागाची संयुक्त बैठक घेऊन पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यात येईल.असे आश्वासन तहसीलदार रणजीत भोसले, कुकडी पाटबंधारे विभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रवीण शिंदे यांनी दिले. त्यानंतर जलसमाधी आंदोलन स्थगित करण्यात आले.

दरम्यान वडज पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाली होती. पूर नियंत्रण व धरण सुरक्षिततेच्या कारणास्तव कुकडी पाटबंधारे विभागाने वडज धरणातून मीना नदी पात्रात 18 हजार ते 20 हजार क्यूसेक्सच्या दरम्यान पाणी सोडले होते. यामुळे मीना नदीला पूर आला होता. पुराच्या पाण्यामुळे पिंपळगाव तर्फे नारायणगाव परिसरातील शेतकऱ्यांची नदीकाठची शेत जमीन, उभी पिके वाहून गेली. आर्वी येथील स्मशानभूमीचे व नारायणगाव येथील इंदिरा झोपडपट्टी मधील घरांचे कौटुंबिक साहित्याचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने पंचनामे करून शेत जमिनीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी.जमिनीच्या संरक्षणासाठी नदीकाठी संरक्षक भिंत बांधावी.या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर, प्रमोद खांडगे, काळुराम सरवदे यांनी सोमवारी मीना नदी पात्रात जलसमाधी आंदोलन केले. आंदोलन स्थळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रकाश कोळेकर, सूरज वाजगे,सचिन थोरवे,माजी सरपंच अरुण व्हाडी, विकास सोसायटीचे अध्यक्ष सुरेश वाणी यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

## अक्षराच्या दुनियेला झिरो सोशल फाउंडेशनचा जीवनदायी आधार

■ पुरंदर (दै. संध्या)

"निरोगी विद्यार्थी, सशक्त भविष्य" या भावनेतून झिरो सोशल फाउंडेशनने आणखी एक समाजोपयोगी उपक्रम राबवत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाघापूर (ता. पुरंदर) येथे २५० लिटर क्षमतेचा शुद्ध पिण्याच्या पाण्याचा वॉटर फिल्टर भेट दिला.

या उपक्रमामुळे शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना वर्षभर शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही अत्यंत मोलाची देणगी ठरणार आहे.

उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर यांच्या माध्यमातून आणि आदर्श नागरिक वैभव फडके यांच्या विशेष प्रयत्नातून हा उपक्रम साकार झाला. सोमवार (दि. २७)



रोजी मान्यवरांच्या हस्ते वॉटर फिल्टरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती पुरंदरच्या माजी सभापती गौरी कुंजीर, पुरंदर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवती अध्यक्ष तथा वाघापूर माजी सरपंच रेवती कुंजीर, ग्रामपंचायत सदस्या कोमल कुंजीर, झिरो सोशल फाउंडेशनच्या सदस्या गौरी फडके, तसेच गावातील पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


याप्रसंगी गणेश पाठक यांनी सांगितले की, "शुद्ध पिण्याचे पाणी हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क आहे. झिरो सोशल फाउंडेशनने दिलेल्या या वॉटर फिल्टरमुळे शाळा व अंगणवाडीतील मुलांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होईल.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त आणि दीर्घकालीन ठरणार आहे."

उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर यांनी झिरो सोशल फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, "समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या झिरो सोशल फाउंडेशनचा हा उपक्रम अनुकरणीय आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणारी ही मदत भविष्यातही अनेक संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल. शाळा या सहकार्याबद्दल सदैव ऋणी राहील," असे सांगितले.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी १६३ कोटी मंजुर

मुंबई : भारतीय रेल्वेने दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मुदखेड दुहेरी रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी महत्वाचा निर्णय घेताना १६३ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मार्गावरील विद्यमान इलेक्ट्रीक ट्रॅक्शन (विद्युत पुरवठा) प्रणालीचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे या मार्गावरील प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेची क्षमता आणि गती दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात ‘वंदे भारत एक्स्प्रेस’सारख्या वेगवान रेल्वेगाड्यांचे अधिक कार्यक्षम संचालन करण्यासाठीही हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पांतर्गत १६४ रेल्वे ट्रॅक मार्गावर सध्या कार्यरत असलेली १x२५ केव्ही इलेक्ट्रिक ट्रॅक्शन प्रणाली बदलून अत्याधुनिक आणि अधिक क्षमतेची २x२५ केव्ही प्रणाली बसविण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाढीव वीजभार हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठा यंत्रणा, उपकेंद्रे आणि संबंधित पायाभूत सुविधांचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. यामुळे रेल्वेगाड्यांना अधिक स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होईल, तसेच रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होईल.परभणी-मुदखेड रेल्वे मार्ग हा भारतीय रेल्वेच्या ‘हायली युटिलाइज्ड नेटवर्क’ (एचयूएन रूट-९) मधील अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो. हा मार्ग अजमेर, इंदूर, खांडवा, अकोला, पूर्णा, मुदखेड, सिकंदराबाद, मेहबूबनगर आणि धोन या प्रमुख शहरांना आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडतो. त्यामुळे या मार्गावरील क्षमतावाढीचा थेट लाभ प्रवासी वाहतूक, उद्योग आणि व्यापार क्षेत्रालाही होणार आहे. या आधुनिकीकरणामुळे उच्च वेगाच्या रेल्वेगाड्या अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने धावू शकतील. तसेच मालवाहतूक रेल्वेची वहनक्षमताही वाढणार असल्याने भारतीय रेल्वेने २०२९-३० पर्यंत ३,००० दशलक्ष टन मालवाहतुकीचे निर्धारित केलेले उद्दिष्ट गाठण्यास मोठी मदत होणार आहे. वाढत्या रेल्वे वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांची क्षमता वाढविण्यासाठी आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### दीक्षान्त समारंभ ज्ञान, परिश्रम आणि मानवसेवेच्या वचनबद्धतेचा सोहळा

नाशिक : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात घेतलेले ज्ञान समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचते तेव्हा आरोग्य शिक्षण खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरते. दीक्षान्त समारंभ पदवी प्रदान सोहळा नाही, तर ज्ञान, परिश्रम आणि मानवसेवेच्या आजीवन वचनबद्धतेचा उत्सव आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २५ वा दीक्षान्त समारंभ आज सकाळी विद्यापीठात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, उपस्थित होते. यावेळी राज्यपाल श्री. वर्मा यांनी पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना कर्तव्याची शपथ दिली.

### सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिकचा जागतिकस्तरावर नावलौकिक उंचवणार

नाशिक : नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्राधिकरणासह जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाचे राज्यापाल जिष्णु देव वर्मा यांनी कौतुक केले. कुंभमेळ्यासाठी करण्यात आलेले नियोजन पाहता नाशिकचा जागतिकस्तरावर नावलौकिक उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाच्या मुख्यालयात राज्यपाल श्री. वर्मा यांनी कुंभमेळा नियोजनाचा आढावा घेतला. यावेळी प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक संजय ऐनापुरे, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा, आदी उपस्थित होते..

# प्रभावी उपाययोजना राबवा : मंत्री आदिती तटकरे

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा अधिक सक्षम करून बालकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच कुपोषण निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

मंत्रालयात नंदुरबार, अमरावती (मेळघाट), गडचिरोली, पालघर (वसई वगळून) आणि रायगड (कर्जत-१ व २) या पाच जिल्ह्यांमधील एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आयसीडीएस) अंतर्गत अंगणवाडी केंद्रांतील पायाभूत सुविधा, आवश्यक उपकरणांची उपलब्धता तसेच जून २०२६ अखेरच्या बालपोषण स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, आयुक्त वर्षा लढ्ढा, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, महिला व बालविकास विभागाचे सहसचिव वि. रा. ठाकूर, अवर सचिव सरदार तसेच आयसीडीएसचे उपायुक्त विजय क्षीरसागर आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, “बालपोषणाच्या आढाव्यात बालकांचे वजन व उंची मोजण्याची कार्यक्षमता ९९ टक्क्यांहून अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. गंभीर तीव्र कुपोषण (SAM), मध्यम तीव्र कुपोषण (MAM), कमी वजन आणि खुंटलेली वाढ (Stunting) यासंदर्भात जिल्हानिहाय विश्लेषण करून ज्या भागांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे, त्या भागांसाठी विशेष कृती आराखडा तयार करावा. तसेच पायाभूत सुविधांच्या उर्वरित कामांसाठी पुढील तीन महिन्यांचा कालबद्ध कृती आराखडा तयार करून सादर करावा.”

अंगणवाडी केंद्रांमध्ये आवश्यक सुविधांची शंभर टक्के उपलब्धता सुनिश्चित करणे, वीज व सौरऊर्जा सुविधांचा विस्तार करणे, आवश्यक उपकरणांची उपलब्धता वाढविणे तसेच महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्यातील समन्वय अधिक परिणामकारक करून कुपोषित बालकांच्या व्यवस्थापनाला गती देण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देशही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.यावेळी अंगणवाडी केंद्रांच्या इमारती, वीज व सौरऊर्जा सुविधा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छतागृहे, कार्यरत स्वयंपाकगृहे तसेच वजनकाटे, इन्फंटोमीटर आणि स्टॅडिओमीटर यांसारख्या आवश्यक उपकरणांच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पाचही जिल्ह्यांतील अंगणवाडी केंद्रांमध्ये पिण्याच्या पाण्याची शंभर टक्के उपलब्धता असल्याचे निदर्शनास आले. तसेच बहुतांश केंद्रांमध्ये स्वच्छतागृहे, स्वयंपाकगृहे आणि बालकांच्या वाढीचे मोजमाप करण्यासाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मात्र, काही भागांमध्ये कायमस्वरूपी वीज जोडणी आणि सौरऊर्जा सुविधांच्या उपलब्धतेत सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचेही नमूद करण्यात आले.

## अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराचे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावे : मंत्री नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील मौजे भांडेवाडी येथे उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराच्या बांधकामाला गती मिळाली असून, प्रकल्पाची सुमारे ३० टक्के भौतिक प्रगती पूर्ण झाली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील मत्स्यव्यवसायाला चालना मिळण्याबरोबरच मच्छी विक्रेत्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पाचे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात भांडेवाडी, नागपूर येथील अत्याधुनिक घाऊक व किरकोळ मासळी बाजाराच्या कामासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. यावेळी



मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन., आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त (दूरदृश्य प्रणालीद्वारे) तसेच विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे म्हणाले, “प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत राज्यात मत्स्यव्यवसायासाठी आधुनिक आणि दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यावर शासनाचा भर आहे. भांडेवाडी येथील घाऊक व किरकोळ मासळी बाजारामुळे विदर्भातील मत्स्यव्यवसायाला नवे बळ मिळेल. मच्छीमार, व्यापारी आणि ग्राहकांना स्वच्छ, सुरक्षित व आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होईल. हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि नियोजित मुदतीत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.”

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मासळीची साठवणूक, विक्री, वाहतूक आणि वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, मत्स्यव्यवसायाशी संबंधित हजारो लाभार्थ्यांना त्याचा थेट फायदा होईल. आधुनिक सुविधा, स्वच्छता आणि सुयोग्य बाजार व्यवस्थापनामुळे नागपूरसह संपूर्ण विदर्भातील मत्स्य व्यवसायाच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

## ठाणे सामान्य रुग्णालयाच्या कामांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून आढावा

■ मुंबई (दै. संध्या)

ठाणे आणि लगतच्या पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना जागतिक दर्जाच्या आणि अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ठाणे येथील ९०० खाटांचे अत्याधुनिक जिल्हा सामान्य रुग्णालय, महिला व बाल रुग्णालय आणि सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या प्रकल्पाचे काम अत्यंत वेगाने आणि ‘फास्टट्रॅक’ पद्धतीने पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री यांच्या समिती कक्षात झालेल्या या बैठकीत ठाणे सिव्हिल हॉस्पिटलच्या सद्यस्थितीचा आणि आतापर्यंत झालेल्या कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री सर्वश्री दादाजी भुसे, गुलाबराव पाटील, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, संजय राठोड, प्रताप सरनाईक यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार उपस्थित होते. प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यातील कामांची गती वाढवतानाच प्रशासकीय पातळीवरील दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले. रुग्णालयाची इमारत पूर्ण झाली असून, वीज जोडणीअभावी रुग्णालयाचे काम सुरू करता येत नसल्याचा मुद्दा बैठकीत चर्चेत आला. यानंतर रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवेसाठी आवश्यक असलेली वीज जोडणीची सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करावीत.

## महाआरोग्य शिबिर एक वरदान

■ मुंबई (दै. संध्या)

आरोग्यम धनसंपदा, असे सुभाषित असले, तरी प्रत्यक्षात आरोग्याकडे दुर्लक्ष हा बहुतांश जणांचा स्थायीभाव असतो. अनेकजण ‘काय होते’, म्हणून आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत, तर पैशांअभावी योग्य उपचार मिळू न शकणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले ‘महाआरोग्य शिबिर’हे रुग्णांसाठी एक वरदान ठरले आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर ज्या क्षेत्रांमध्ये त्यांनी विशेष लक्ष देण्याचा संकल्प केला, त्यात आरोग्य क्षेत्र एक प्रमुख आहे. गरिबातल्या गरीब माणसाला आरोग्य सुविधा कशा सहज मिळू शकतील, याद्दष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊ लागले आहे. त्यासाठी त्यांनी रुग्णालयांची संख्या वाढविली आणि अस्तित्वात असलेली रुग्णालये अत्याधुनिक केली. दुर्गम भागातील गरीब आदिवासी बांधव उपचारांसाठी मोठ्या शहरांपर्यंत पोहचू शकत नाहीत, म्हणून मग रुग्णालयेच त्यांच्या परिसरात उभारली.

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरीत अलीकडेच झालेले स्वतंत्र महिला रुग्णालय हे त्याचेच उत्तम उदाहरण आहे. नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) यांचा कायापालट करून विदर्भच नव्हे तर शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश, तेलंगणा, आंध्रप्रदेश येथील रुग्णांनाही अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळण्याची सोय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या साऱ्या उपाययोजनांसोबतच आरोग्याच्या क्षेत्रात आणखी काय- काय करता येईल याद्दष्टीने शासनाचे प्रयत्न सुरू आहेत.

## मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे काम वेळेत पूर्ण करा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील मत्स्य शिक्षण आणि संशोधनाला नवे बळ देण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे उभारण्यात येत असलेल्या नवीन मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या बांधकामाला गती देण्यात येत आहे. हा प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात मोर्शी, जिल्हा अमरावती येथील नवीन मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या बांधकामाबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन., आयुक्त प्रेरणा देशभ्रतार तसेच विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे अमरावती येथील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, राज्यातील मत्स्य क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे, आधुनिक संशोधनाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून, त्याच्या उभारणीतील प्रत्येक टप्प्याचा नियमित आढावा घेतला जाईल.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मोर्शी येथे नवीन मत्स्य विज्ञान महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजासाठी मोर्शी येथील सुमारे ४.०८ हेक्टर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी सिंभोरा येथील राष्ट्रीय मत्स्य बीज केंद्राची सुमारे ३३ हेक्टर जमीन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाकडे विनामूल्य हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

बैठकीत महाविद्यालयाच्या बांधकामा संदर्भातील विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पाच्या कामात कोणताही विलंब होऊ नये, गुणवत्तेची तडजोड होऊ नये आणि नियोजित वेळेत काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मंत्री नितेश राणे यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

राज्यातील मत्स्य व्यवसाय क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासाला चालना देण्याच्या दिशेने मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालय हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. विदर्भासह राज्यातील विद्यार्थ्यांना त्याचा मोठा लाभ होईल, असा विश्वासही मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

## पुनर्विकासातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत : सचिन अहिर

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबईतील जुन्या इमारती, चाळी तसेच पुनर्विकास प्रकल्पांतील रहिवाशांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले.

विधानभवनातील दालनात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत कलशेटकर कंपाउंड येथील ९५ वर्षे जुन्या‘रामदास मंडळा’स पुनर्विकसित इमारतीमध्ये योग्य जागा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच हररवाला बिल्डिंग क्र. १८ व १९ मधील रहिवाशांना पुनर्विकासादरम्यान देण्यात येणाऱ्या भाड्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचा आढावा घेण्यात आला.

याशिवाय यदुवंशी अहिर ग्वाल सकल पंच, कृष्ण छाया (दुरुस्ती इमारत), खिमजी नाणजी कोठारी चाळ, अयोध्या सोसायटी तसेच वॉर्डन वकील चाळ येथील रहिवाशांच्या विविध समस्या आणि तक्रारींवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. पुनर्विकास प्रक्रियेत मूळ रहिवासी किंवा स्थानिक संस्थांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, याची दक्षता घेऊन प्राप्त तक्रारींवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी. तसेच पात्र रहिवाशांना लवकरात लवकर दिलासा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



## थोडक्यात पण महत्वाचे



## कचरा डेपो दुर्घटनेतील दोन गंभीर जखमींवर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये नवजीवन

**पुणे : दैनिक संध्या**

मोशी येथील कचरा डेपो संरचना कोसळल्याच्या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोन रुग्णांवर भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक बहुविद्याशाखीय ट्रॉमा केअरच्या माध्यमातून यशस्वी उपचार करण्यात आले असून दोन्ही रुग्णांना सुखरूप डिस्चार्ज देण्यात आला आहे. या दुर्घटनेतील गंभीर जखमी महेश चंद्रकांत राऊत (वय ३६) यांना बचाव पथकाने बाहेर काढल्यानंतर ९ जुलै २०२६ रोजी पहाटे मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्या डाव्या मांडीला मोठी उघडी जखम, कपाळ व डोक्याला गंभीर जखमा व कवटीचे फ्रॅक्चर, डाव्या हाताच्या टेंडनला इजा तसेच कमरेच्या मणक्याला (लंबर स्पाईन) फ्रॅक्चर अशा अनेक जीवघेण्या दुखापती झाल्या होत्या. रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात घेऊन ऑर्थोपेडिक्स, प्लास्टिक अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी, न्यूरोसर्जरी, क्रिटिकल केअर, इंटरनल मेडिसिन, नेफ्रोलॉजी आणि सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या बहुविद्याशाखीय पथकाने तातडीने उपचार सुरू केले. डॉ. राहुल दुला गागरे आणि डॉ. दीपक सदाशिव पाटील यांच्या नेतृत्वाखाली रुग्णावर टप्प्याटप्प्याने अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये आपत्कालीन वाउंड डिब्राइडमेंट, व्हॅक्यूम-असिस्टेड क्लोजर (VAC) थेरपी, बायोडिग्रेडेबल टेम्पोरायझिंग मॅट्रिक्स (BTM) चा वापर करून सॉफ्ट टिश्यू पुनर्बांधणी, डाव्या हाताच्या टेंडनची दुरुस्ती, शरीरात घुसलेले काचेचे तुकडे काढणे, चेहऱ्यावरील जखमांवर उपचार तसेच डोके आणि मानेवरील अनेक जखमा बंद करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

## पांगरी माथा परिसरात बेदरकरपणे महिंद्रा पिकप जीप चालवून स्टंट करणाऱ्यांवर गुन्हा

**जुन्नर : दैनिक संध्या**

जुन्नर पोलीस स्टेशन हद्दीत मौजे पांगरी माथा कुमशेत फाटा परिसरात आरोपी नामे रवी रविराज बन्सी गायकवाड याने त्याचे मालकीचे पिकप वाहन क्रमांक एम एच 14 के क्यू 86 53 हे कोणताही वैद्य परवाना नसताना देखील त्याचा भाऊ नावे सुनील बन्सी गायकवाड राहणार कुसुर यास चालवण्यास दिली व त्याने मालाने भरलेली वर नमूद गाडी ही स्वतः कडे कोणताही वैद्य परवाना नसताना भरधाव वेगात चालवून वेडी वाकडी फिरवून स्टंटबाजी करत हयगयीने व अविचाराने सार्वजनिक ठिकाणी स्वतःचे व लोकांचे जीवित धोका निर्माण होईल असे बेदरकारपणे गाडी चालवून कृत्य केले आहे व त्याचे चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित केले असल्याने जुन्नर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर - 240/2026 भारतीय न्याय संहिता. कलम .281, 125, 3(5) व मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 184 अन्वये नोंद करण्यात आला आहे. अशाप्रकारे वाहतूक करणाऱ्या चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता स्टंटबाजी केल्यास पोलीस ठाणेकडून कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे वरिष्ठांचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांना आदेश आहेत. वाहन चालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत अन्यथा अशा स्टंटबाजावर जुन्नर पोलीस ठाण्याकडून कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदरची कारवाई वाहतूक पोलीस शिपाई गणेश शिंदे व पथकाने केलेली आहे.



## चाकणला ज्ञानवर्धिनी विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**चाकण : दैनिक संध्या**

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल, स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या अध्यक्षतेखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, प्रेरणा काळे, विभाग प्रमुख सुवर्णा काकडे, गणेश काळे, लिना नारखेडे आदी उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे संस्थापक स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे व सरस्वती देवतेचे प्रतिमा पुजन करण्यात आले. मुलांनी यावेळी गुरु व्यास तसेच गुरु-शिष्य जोडी प्रमाणे वासिस्ट - श्रीराम, संदीपान - श्रीकृष्ण, संत निवृत्ती - संत ज्ञानेश्वर, रामदास स्वामी - शिवाजी महाराज, परमहंस - स्वामी विवेकानंद, महात्मा फुले - सावित्रीमाई फुले आदींच्या वेशभूषा केल्या होत्या. शिक्षक यांनी अध्यक्ष यांना आणि विद्यार्थी यांनी शिक्षक यांना गुरु मानून पूजन केले. गुरुदक्षिणा व कृतज्ञता म्हणून सर्व शिक्षक यांचा गुलाबपुष्प देऊन संस्थेच्या वतीने विकास गोरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मंथन परीक्षेत गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शन करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्राचार्या प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

## जिल्हा बँकेच्या पुरंदरमधील उत्कृष्ट अधिकाऱ्यांचा गौरव

**सासवड : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने गतवर्षीप्रमाणे यंदाही उत्कृष्ट काम करणाऱ्या पुरंदर तालुक्यातील गुणवंत सेवकांचा सन्मान सोमवारी (ता.२७) बँकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या हस्ते झाला. यामध्ये पुरंदर तालुक्यातून उत्कृष्ट शाखाधिकारी म्हणून परिंचे शाखेचे सुधीर शिवाजीराव धुमाळ, उत्कृष्ट विकास अधिकारी म्हणून चांबळी आणि शिवरी शाखेचे शिरीष जाधव, तर उत्कृष्ट सचिव म्हणून बोपगावचे अमोल दत्तात्रय फडतरे यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी अध्यक्ष रमेश थोरात, माजी आमदार अशोक पवार, बँकेचे पुरंदर विभागीय अधिकारी महेश खैरे, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे यांच्यासह जिल्हा बँकेचे सर्व संचालक उपस्थित होते.



# नीरा खोऱ्यातील धरणांमध्ये ९१.९७ टक्के पाणीसाठा

## मागील वर्षाच्या तुलनेत वाढ : शेती आणि पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

■ नीरा (दै. संध्या)

यावर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे नीरा खोऱ्यातील चार प्रमुख धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा झाला आहे. २९ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, चारही धरणांची एकूण उपयुक्त साठवण क्षमता ४८.१९८ टीएमसी असून त्यापैकी ४४.३२६ टीएमसी म्हणजेच ९१.९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मागील वर्षी याच दिवशी हा साठा ४४.१२७ टीएमसी (९१.३१ टक्के) इतका होता. त्यामुळे यंदा मागील वर्षाच्या तुलनेत अधिक पाणीसाठा उपलब्ध असून आगामी काळातील पिण्याचे पाणी व सिंचनासाठी ही अत्यंत दिलासादायक बाब मानली जात आहे.



भाटघर धरणाची उपयुक्त साठवण क्षमता २३.५०२ टीएमसी असून सध्या त्यामध्ये २०.६६२ टीएमसी म्हणजे ८७.९२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. धरण क्षेत्रात ५८० मिमी पावसाची नोंद झाली असून, सध्या २३५ क्युसेक पाण्याची आवक सुरू आहे. नीरा देवघर धरणाची उपयुक्त साठवण क्षमता ११.७२९ टीएमसी असून त्यामध्ये ११.१२६ टीएमसी म्हणजे ९४.८६ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण परिसरात १,३६२ मिमी पावसाची नोंद झाली असून, ११० क्युसेक पाण्याची आवक होत आहे. तसेच वीज निर्मितीसाठी ७५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

वीर धरणाची उपयुक्त साठवण क्षमता ९.४०८ टीएमसी असून त्यामध्ये ९.३४० टीएमसी म्हणजे ९९.२८ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण क्षेत्रात २८५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. धरणातून सध्या एकूण ५,७३७ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून, त्यामध्ये स्पिलवेमधून ४,६३७ क्युसेक आणि एस्केपमधून १,१०० क्युसेक पाणी सोडले जात आहे. याशिवाय, नीरा डावा कालव्यातून ८२७ क्युसेक आणि नीरा उजवा कालव्यातून १,५५० क्युसेक पाणी शेतीसाठी सोडण्यात येत आहे.

गुंजवणी धरणाची उपयुक्त साठवण क्षमता ३.६९७ टीएमसी असून त्यामध्ये ३.१९८ टीएमसी म्हणजे ८६.६६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. धरण क्षेत्रात १,४५९ मिमी पावसाची नोंद झाली असून, २९ क्युसेक पाण्याची आवक होत आहे. वीज निर्मितीसाठी २५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नीरा खोऱ्यातील धरणांमधील हा पाणीसाठा पुणे, सोलापूर, बारामती, इंदापूर, पुरंदर आणि फलटण परिसरातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच हजारो हेक्टर क्षेत्रावरील सिंचनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. ऊस, डाळिंब, भाजीपाला आणि इतर नगदी पिकांसाठी नीरा प्रणालीचे पाणी जीवनदायी मानले जाते. धरणांमधील वाढलेला पाणीसाठा पाहता, आगामी रब्बी हंगामासाठी जलसुरक्षेचा मजबूत पाया तयार झाला असून शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## शिरूर नगरपरिषद विशेष सर्वसाधारण सभेत आरक्षणांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर नगरपरिषदेची विशेष सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष ऐश्वर्या अभिजित पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली शिरूर शहराच्या मंजूर विकास आराखड्यातील विविध आरक्षणांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष ऐश्वर्या अभिजित पाचर्णे,उपाध्यक्ष मितेश प्रदीप गादिया,सभापती सुनील जाधव,सभापती एजाज बागवान,सभापती डॉ.सुनीता पोटे,सभापती स्वाती साठे,सभापती आयेशा सय्यद,उपसभापती स्वप्नाली जामदार,भाजपचे नितीन पाचर्णे यांच्या सह नगरसेवक,मुख्याधिकारी प्रितम पाटील तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेषतः म्युनिसिपल इंडस्ट्रियल इस्टेटसाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीची मालकी नगरपरिषदेकडे कायम ठेवण्यास तसेच मंजूर विकास आराखड्यानुसार त्या जागेचा वापर बदलण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.सभेत सादर करण्यात आलेल्या विषयानुसार,शिरूर नगरपरिषद हद्दीतील सुमारे १५ एकर क्षेत्रावरील शासकीय जमिनीचा पूर्वीचा वापर बदलून मंजूर विकास आराखड्यात नमूद असलेल्या आरक्षणांनुसार क्रीडांगण, बाग,ग्रंथालय,सांस्कृतिक सभागृह तसेच व्यापारी संकुल यांसारख्या सार्वजनिक सुविधांचा विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला.या बदलासाठी महाराष्ट्र शासनाकडे आवश्यक प्रस्ताव पाठविण्यात आला असून संबंधित विभागांकडून सकारात्मक कार्यवाही सुरू असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

## श्री. शिवशंभो माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

■ जेजुरी (दै. संध्या)

श्री शिवशंभो माध्यमिक विद्यालय, खळद येथे व्यासमुनी जयंतीनिमित्त गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक हरिभाऊ टापरे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते व्यासमुनी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश बोरावके यांनी केले. विद्यार्थी मनोगत सत्रात अनेक विद्यार्थ्यांनी गुरुंबद्दलचा आदर, कृतज्ञता आणि त्यांच्या जीवनातील महत्त्व विषद केले. "गुरु म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा, विचारांचा खजिना, विद्यार्थ्यांचे हित जोपासणारा हितचिंतक आणि आपल्या शिष्यांना नेहमी उंचीवर पाहण्याची भावना बाळगणारा प्रेरणादायी शिक्षक आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडविण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे," अशा भावपूर्ण शब्दांत विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले.




यावेळी किरण कदम, वेदिका कटके, दुर्वा कामठे, शार्दुल अकार्षे, श्रुती खळदकर, श्रिया गायकवाड, आर्या जगताप तसेच मुख्याध्यापक हरिभाऊ टापरे यांनीही गुरुपौर्णिमेचे महत्त्व अधोरेखित करणारे प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन दिलीप जगताप, रामचंद्र कामठे, सुस्मिता चव्हाण, सायली गोरे, उत्कर्षा फुले, दीप्ती खोमणे, प्रकाश हांडे, बाळासाहेब खळदकर, बाबुराव गायकवाड, वैजयंता मांढरे आणि प्रमोद यादव यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन स्वरा पवार व ऋतुजा कामठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुस्मिता चव्हाण यांनी केले.

## 'आम्ही इंग्रजी शिकतो' उपक्रमाचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न



■ लोणी काळभोर (दै. संध्या)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने इंग्रजी बोलता यावे, त्यांच्या श्रवण, आकलन व संवादकौशल्याचा विकास व्हावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण इंग्रजी शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने पुणे जिल्हा परिषद आणि सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या आम्ही इंग्रजी शिकतो या वर्षभर चालणाऱ्या अभिनव उपक्रमाचा लोकार्पण सोहळा सोमवारी लोणी काळभोर (ता. हवेली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ (मुलींची) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमाचे उद्घाटन अध्यक्ष,जिल्हा परिषद पुणे वीरधवल जगदाळे,यांच्या मार्गदर्शनानुसार गजानन पाटील ,मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,पुणे यांच्या हस्ते झाले.

"इंग्रजी शिक्षण हे केवळ विषयापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या दैनंदिन व्यवहाराचा भाग झाले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण सराव यांच्या माध्यमातून हा उपक्रम निश्चितच यशस्वी ठरेल. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह प्रभावी संवादकौशल्य विकसित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावेल."

**- चंद्रकांत वाघमारे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद पुणे**

"विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेबाबत आत्मविश्वास निर्माण करून त्यांचे श्रवण, संभाषण आणि आकलन कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे. 'We Learn English' हा उपक्रम आधुनिक तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण अध्यापन यांचा प्रभावी संगम असून, जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांच्या भाषा विकासासाठी तो निश्चितच मैलाचा दगड ठरेल. शिक्षकांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास शिक्षण विभाग कटिबद्ध आहे."

**- श्रीमती ललिता दहीतुले-कावडे जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे**

"आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात इंग्रजी भाषेचे ज्ञान ही काळाची गरज आहे. इंग्रजी ही भीतीची नव्हे तर संधींची भाषा आहे.आम्ही इंग्रजी शिकतो या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीबाबत आत्मविश्वास निर्माण होईल. रेडिओ, मोबाईल अँप आणि ध्वनीमुद्रित धड्यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत दर्जेदार इंग्रजी शिक्षण पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करतील, असा मला विश्वास आहे."

**- गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे**

# पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; 'सूर्यदत्त' तर्फे 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड २०२६'चे वितरण

■ पुणे (दै. संध्या)

"पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनातून त्यात योगदान देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यासाठी वैयक्तिक पातळीपासून सुरुवात होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे (आयसर) सल्लागार डॉ. अरविंद नातू यांनी केले. शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विकसित केलेल्या 'आर-९ पॉइंट प्रोग्राम'ची माहितीही त्यांनी दिली.




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चच्या वतीने आयोजित 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड्स २०२६' वितरण सोहळ्यात डॉ. अरविंद नातू बोलत होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सी-रत्न सभागृहात आयोजित कार्यक्रमात कायनेटिक कम्युनिकेशन्स लिमिटेडचे संचालक डॉ. दीपक शिकारपूर, 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, डॉ. सारिका झांबड आदी उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण आणि शाश्वत विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड २०२६'ने सन्मानित करण्यात आले. मेधा ताडपत्रीकर, डॉ. राहुल मराठे, डॉ. श्वेता लोखंडे, शिल्पा भालेराव, प्राची शेवगावकर, डॉ. किरण वैद्य यांना पुरस्कार देण्यात आला. मानपत्र, सुवर्णपदक व 'सूर्यदत्त'चे उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण पर्यावरणाचे मालक नाही, तर त्याचे केवळ विश्वस्त आहोत. त्यामुळे पर्यावरणाचे जतन, संवर्धन आणि समृद्धीकरण करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, जेणेकरून ही अमूल्य नैसर्गिक संपदा आपण पुढील पिढ्यांकडे सुरक्षितपणे सुपूर्द करू शकू."

डॉ. दीपक शिकारपूर यांनी हरित माहिती तंत्रज्ञान (ग्रीन आयटी) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण संवर्धनास चालना देण्याची गरज व्यक्त केली. तसेच पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

मेधा ताडपत्रीकर यांनी पर्यावरणपूरक नवकल्पनांची आवश्यकता अधोरेखित केली. डॉ. राहुल मराठे यांनी शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मितीचे महत्त्व सांगितले. डॉ. श्वेता लोखंडे यांनी जलसंपदा आणि आरोग्य क्षेत्रातील परस्परसंबंध स्पष्ट करत विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. शिल्पा भालेराव यांनी उद्योग क्षेत्रात शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यावर भर दिला, तर प्राची शेवगावकर यांनी हवामान बदलाचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरात कृतीशील भूमिका घ्यावी, असे सांगितले. डॉ. किरण वैद्य यांनी हरितगृह परिणामाचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट केले.

सुषमा चोरडिया यांनी सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासूनच पर्यावरणपूरक कॅम्पसवर भर दिला आहे. वृक्षाथॉनसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश दिला जातो. विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन उपक्रमात सामावून घेतले जाते, त्यातून त्यांच्यामध्ये पर्यावरणाविषयी आस्था निर्माण होते, असे सांगितले.

स्नेहल नवलखा यांनी स्वागत प्रास्ताविक केले. डॉ. सारिका झांबड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका मांडली. श्रद्धा फाटक यांनी उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली. भाग्यश्री पवार यांनी आभार मानले.